मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर,
विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर,
धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | शनिवार, १३ सप्टेंबर २०२५ | वर्ष: १ | अंक:१०१ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## चाक निखळलेल्या स्पाइसजेटच्या विमानाचे सुरक्षित लँडिंग

मुंबई, दि. १२ प्रतिनिधी

चाक निखळलेल्या स्पाइसजेट कंपनीच्या बॉम्बार्डियर विमानाचे मुंबई विमानतळावर यशस्वीरित्या लँडिंग करण्यात आले आहे. यामुळे मोठी दुर्घटना टळल्याची भावना व्यक्त होत आहे. ७५ प्रवाशी असलेल्या स्पाइसजेट क्यू ४०० या विमानाने गुजरातच्या कांडला विमानतळावरून उड्डाण घेतले होते. मात्र त्याचे एक चाक तेथील विमानतळावर निखळले. मात्र यानंतरही मुंबई विमानतळावर विमानाचे सुरक्षितपणे लँडिंग करण्यात यश आले आहे, त्यामुळे सुटकेचा निश्वास सोडला गेला. स्पाइसजेटच्या प्रवक्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ सप्टेंबर रोजी कांडला ते मुंबई प्रवास करणाऱ्या क्यू४०० या विमानाचे उड्डाण झाल्यानंतर विमानाच्या बाहेरच्या बाजूचे चाक धावपट्टीवर आढळून आले. विमानाने मुंबई विमानतळावर यशस्वीरित्या लँडिंग केले असून सर्व प्रवासी सुखरूप आहेत. त्यांना सुरक्षितपणे बाहेर काढले गेले.

## अग्राग्रलेख
### खरीखरी

## १० + २ = १२

काल गरियाबंद येथील चकमकीत दहा नक्षलवादी मारले गेले. आज छत्तीसगडमधील आणखी दोघांना ठार करून ते ज्या नरकात राहत होते त्या नरकातून दुसऱ्या नरकात पाठवण्यात आले. अशा प्रकारे दहा + दोन = बारा नक्षलवाद्यांचे पोलिसांनी आणि नक्षलविरोधी टीमने अगदी दणदणीत बारा वाजवलेले आहेत. आपल्या देशात जवळजवळ ५० वर्षांपूर्वी नक्षलवादी आंदोलनाची सुरुवात झालेली होती. सिद्धार्थ शंकर राय हे तेव्हा पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री होते, त्यानंतर देशात क्रांती करायची आहे अशी भाषा बोलून हे सगळे तथाकथित क्रांतीकर्ते जन आंदोलनाच्या नावावर पुढच्या काळात मोठ्या प्रमाणात निरपराधांचे जन-निर्दालन करायला लागले. अमुक एखादा सरपंच पोलिसांचा खबरी आहे त्याला मारून टाका, असे आदेश निघू लागले. अगदी अठरा वर्षाच्या कोवळ्या तरुणाला त्यांनी स्वातंत्र्य दिना दिवशी राष्ट्रीय ध्वज म्हणजेच तिरंगा फडकवला म्हणून त्याला मारून टाकण्याचा निर्णय झाला आणि त्याला स्वर्गयात्रेस पाठवण्यात आले. हे नक्षलवादी आपल्या महाराष्ट्रात गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया या भागातील जंगलात कार्यरत होते. ते भारतातील अनेक घनदाट अरण्यात आपल्या कारवाया करवीत असत. या नक्षलवाद्यांचा दहशतवाद इतका फोफावला होता की, बड्या बड्या कंपन्यांकडून त्यांना रसद पुरवली जात होती. खरे तर जनआंदोलनाच्या आणि चळवळीच्या नावाखाली सरळ सरळ खंडणी मागितली जात होती. ते आता निष्पन्न झाल्यामुळे चळवळीतील अग्रणी असलेल्या बऱ्याच मंडळींनी सरकारला शरण घेण्यात धन्यता मानलेली आहे. हे नक्षली आंदोलन निरपराधांना ठार करते, वाटेल त्याला वाटेल तो दंड देते, मग त्याचा मुकाबला करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पोलिसांना अधिकार देण्यात आले होते. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी २०२५ पर्यंत नक्षलवादी चळवळीला संपूर्णपणे संपवायचेच आहे आणि त्याची तयारी जोरात सुरू आहे असे अलीकडेच सांगितले होते. तेलंगणा, महाराष्ट्र आणि इतर काही भागात या चळवळीला क्रांतिकारी म्हणण्यात येते. परंतु या चळवळीचे म्होरके अत्यंत माणूसद्रोही आहेत आणि माणुसकीद्वेषी आहेत, असे बऱ्याच आदिवासी आणि नक्षलग्रस्त जनतेचे मत निर्माण झालेले आहे. एखाद्या माणसाला मारणे म्हणजे त्यांना टूथपेस्टने दात घासण्यासारखे सोपे वाटते. त्यामुळे त्या नक्षलवाद्यांनी केवळ छत्तीसगडच नाही, तर जंगलातील इतर मोठ्या भूभागावरही आपला तंबू गाडत आणला होता. आधीचा तंबू गृहमंत्री शहा यांनी नेस्तनाबूत करून टाकला आहे. तरी अजूनही हे नक्षलवादी शंभर टक्के सरकारमित्र बनलेले नाहीत. नक्षलग्रस्त अशा या दुर्गम भागातील गडचिरोली जिल्ह्यात प्रकाश आमटे आणि अभय बंग या दोन डॉक्टरांनी त्या भागातील गरीब आदिवासी आणि निरक्षर रहिवाशांच्यासाठी उघडलेले दवाखाने अलीकडच्या काळात नक्षल्यांना सुद्धा प्रिय वाटत आहेत. यावर्षीच्या शेवटपर्यंत नक्षलींना एकतर मुख्य प्रवाहात आणायचे आहे आणि त्यासाठी जे तयार नसतील, त्यांना रौरव नरकात पाठवायचे आहे. अशी देशाच्या गृहमंत्र्यांची प्रतिज्ञा आहे. गृहमंत्री अमित शहा यांच्या कठोर कारवाइमुळे नक्षलग्रस्त भागात नक्षलवाद्यांच्या मनात मोठी दहशत निर्माण झालेली आहे. हे नक्षलवादी आपल्या देशाच्या विकासाच्या आड येऊ नयेत म्हणून सरकारने मोठ्या प्रमाणात कारवाइ सुरू करून जवळपास दोन वर्षे झाली आहेत. जर महाराष्ट्राने आता मनात आणले तर ही चळवळ आपोआपच थंड बस्त्यात जाऊ शकते. नक्षलींच्या मागण्या योग्य असल्या तरी आता ही मंडळी वाट चुकलेली वाटत नाहीत. नक्षल्यांना वाट चुकलेली मंडळी म्हणणाऱ्यांना ही गोष्ट आता चांगलीच लक्षात आलेली आहे. त्यामुळे आता यापुढे कारवायांवर कारवाया होणारच आहेत. कोणे एकेकाळी हा अमुक एक भाग काही वर्षांपूर्वी नक्षलग्रस्त होता असे म्हणावे लागेल. इतक्या जोरात यापुढे कारवाया होऊ शकतात. कारण निर्धार झालेला आहे, त्यामुळे गृहमंत्र्यांच्या निर्धाराने ही बाब ही सिद्ध होइलच, यात काही शंका नाही.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# नाशिकमध्ये उद्धव सेना-मनसेचा संयुक्त जनआक्रोश मोर्चा

नाशिक, दि. १२ प्रतिनिधी

**उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संभाव्य युतीमुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला नवीन वळण मिळण्यास सुरुवात झाली आहे. आज नाशिकमध्ये उद्धवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने संयुक्त जनआक्रोश मोर्चा काढला. हा मोर्चा भाजप सरकारच्या फोडाफोडीच्या धोरणाला आणि नाशिकमधील वाढत्या गुन्हेगारी व भ्रष्टाचाराविरोधात असल्याचं सांगण्यात आले. हजारो कार्यकर्त्यांनी या विराट मोर्चाला हजेरी लावली. शिवसेना खासदार संजय राऊत आणि मनसे नेते बाळा नांदगांवकर यांनी या मोर्चाचे नेतृत्व केले. नाशिक महानगरपालिकेतील भ्रष्टाचार आणि शहरातील कायदा व सुव्यवस्थेची दयनीय अवस्था हा मुख्य मुद्दा उपस्थित करत आंदोलनकर्त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली.**



हा संयुक्त मोर्चा शहरातील प्रमुख चौकांमधून काढण्यात आला, ज्यात शिवसेना आणि मनसे कार्यकर्ते पहिल्यांदाच एकत्रितपणे मोर्चात सहभागी झाले. हा मोर्चा आगामी महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे. या आंदोलनात मनसे नेते बाळा नांदगावकर म्हणाले की, सध्या वेगवेगळ्या पक्षातून माणसं जमवण्याचं काम भाजपा करत आहे. परंतु आम्ही सगळे मराठी म्हणून एकत्र आलोय. ज्या नाशिकला दत्तक घेतले त्याला काय मिळाले, रस्त्यावर खड्डे, कायदा सुव्यवस्था बिघडला. केंद्रापासून गल्लीपर्यंत तुमचे सरकार आहे. नाशिककरांच्या तोंडाला पाने पुसण्याचं काम भाजपाने केले. खोटारडेपणाचा कळस जनतेच्या एकजुटीमुळे उघडा पडेल. दोन भाऊ एकत्र आलेत, जनता त्यांच्यामागे उभी आहे. आम्ही सगळे एक आहोत. हा मोर्चा फक्त सुरूवात आहे. नाशिकच्या पावनभूमीतून सुरू झालेला हा मोर्चा आगामी काळात राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात, शहरात काढला जाईल असं त्यांनी सांगितले.

तर नाशिक शहरात गुन्हेगारी वाढली आहे. युवकाचा खून करून आरोपी पालकमंत्र्यांना भेटायला जातो. या शहरात ४० खून झाले. जमिनी लुबाडण्यासाठी हत्या केल्या जात आहेत. हा मोर्चा सुरुवात आहे. यापुढे नाशिकमध्ये नाही तर महाराष्ट्रात संयुक्त मोर्चा होणार आहे. २ भाऊ एकत्र आले. २ नेते एकत्र आले, कार्यकर्ते एकत्र आले. त्यामुळे यापुढे जनता ठाकरेंच्या मागे जाईल. आमच्या सगळ्यांचा मायबाप बाळासाहेब ठाकरे हेच आहेत. त्यामुळे यापुढे आमच्याशी सामना करताना तुम्हाला खूप काळजी घ्यावी लागेल. महापालिकेत जिल्हा परिषदा असतील तिथे परिवर्तन करावे लागेल. या जनआक्रोश मोर्चातून आपण आव्हान उभे केले आहे. ते आव्हान टिकवण्याची जबाबदारी आपल्यावर आहे असं खासदार संजय राऊत यांनी सांगत भाजपाला इशारा दिला.

मोर्च्यात मुख्यतः नाशिकमधील वाढत्या गुन्हेगारीला आणि महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराला विरोध करण्यात आला. गेल्या सहा महिन्यांत शहरात ४० हत्या झाल्या असून, कोयता गँगच्या कारवाया, वाहनांची तोडफोड, महिलांवरील अत्याचार, चेन स्नॅचिंगच्या घटना वाढल्या आहेत. याशिवाय, ड्रग्स विक्री, शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि पाण्याची टंचाई ही प्रमुख समस्या आहेत. महानगरपालिकेतील जमीन अधिग्रहण प्रक्रियेत भ्रष्टाचार, स्मार्ट सिटी प्रकल्पातील अनियमितता आणि शहरातील खड्ड्यांची समस्या यावरही तीव्र भाष्य करण्यात आले.

## ...तर तुम्ही राज्य करायला नालायक - संजय राऊत

संजय राऊत म्हणाले की, आमचा अंत पाहू नका. त्या राहुल धोत्रेचा फोटो पाहून मी मघापासून अस्वस्थ आहे. हा राहुल धोत्रे तरुण मुलगा आहे. त्याची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. त्याची हत्या देवेंद्र फडणवीसांचा कार्यकर्ता, गिरीश महाजनांच्या कार्यकर्त्याने केलेली आहे. कुठे गेला हा उद्धव निमसे? कसा सापडत नाही हा? तुमचा एक नगरसेवक खून करून फरार होतो. तो फरार असताना गिरीश महाजनांना जाऊन भेटतो. त्याला कोण वाचवत आहे? हे जर राज्याच्या गृहमंत्र्यांना आणि नाशिकच्या पालकमंत्र्यांना माहीत नसेल तर तुम्ही राज्य करायला नालायक आहात, असा घणाघात त्यांनी यावेळी केला.

# राधाकृष्णन यांनी घेतली उपराष्ट्रपतीपदाची शपथ

नवी दिल्ली, दि. १२ वृत्तसंस्था



नुकत्याच पार पडलेल्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत सी. पी. राधाकृष्णन यांनी विजय मिळवला होता. आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना देशाचे १५ वे उपराष्ट्रपती म्हणून शपथ दिली. या समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. शपथविधीनंतर लगेचच उपराष्ट्रपती राधाकृष्णन दुपारी १२:३० वाजता राज्यसभेतील सर्व नेत्यांसोबत बैठक घेणार आहेत.

दरम्यान राजीनाम्यानंतर माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड हे पहिल्यांदाच एखाद्या सार्वजिनिक कार्यक्रमाला उपस्थित राहिले होते. तत्पूर्वी सी. पी. राधाकृष्णन यांनी उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक जिंकल्यानंतर जगदीप धनखड यांनी त्यांना पत्राद्वारे शुभेच्छा दिल्या होत्या. धनखड यांनी २१ जुलै रोजी प्रकृती अस्वास्थ्यामुळे राजीनामा दिला होता.

यापूर्वी, जगदीप धनखड यांनी राधाकृष्णन यांना अभिनंदन करणाऱ्या पत्रात लिहिले होते की, "आदरणीय राधाकृष्णन जी, जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारताचे उपराष्ट्रपती म्हणून निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन. या प्रतिष्ठित पदावरील तुमची निवड आपल्या देशाच्या लोकप्रतिनिधींचा तुमच्यावर असलेला आत्मविश्वास दर्शवते. सार्वजनिक जीवनातील तुमच्या प्रचंड अनुभवामुळे, तुमच्या नेतृत्वाखाली या प्रतिष्ठित पदाला निश्चितच अधिक आदर आणि गौरव मिळेल. या महत्त्वाच्या प्रसंगी, तुमच्या यशस्वी कार्यकाळासाठी आणि आपल्या महान देशाच्या सेवेसाठी माझ्या शुभेच्छा."

एनडीएचे उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांनी उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विजय मिळवून ते भारताचे १५ वे उपराष्ट्रपती म्हणून निवडून आले आहेत. त्यांनी इंडिया आघाडीचे उमेदवार बी. सुदर्शन रेड्डी यांचा १५२ मतांनी पराभव केला. राधाकृष्णन यांना एकूण ४५२ मते मिळाली तर रेड्डी यांना ३०० मते मिळाली होती.

२०२२ मध्ये झालेल्या उपराष्ट्रपती निवडणुकीत एकूण ७२५ खासदारांनी मतदान केले होते. त्यापैकी एनडीएचे उमेदवार जगदीप धनखड यांना ५२८ आणि विरोधी उमेदवार मार्गारेट अल्वा यांना १८२ मते मिळाली होती. तर, १५ मते अवैध ठरली होती. धनखड यांनी विरोधी उमेदवार मार्गारेट अल्वा यांचा ३४६ मतांनी पराभव केला होता. सुमारे दोन महिन्यांपूर्वी त्यांनी आरोग्याच्या कारणास्तव राजीनामा दिला होता.

# ओबीसी आरक्षण हवे तर बाकीचे सोडा - भुजबळ

मुंबई, दि. १२ प्रतिनिधी

महाराष्ट्रात आरक्षणाच्या राजकारणाने पुन्हा पेट घेतला आहे. मराठा समाजाच्या मागण्यांवरून सुरू असलेल्या संघर्षात आता ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी नवा मुद्दा उचलून धरला आहे. त्यांच्या थेट सवालाने मराठा समाजातील आजी-माजी लोकप्रतिनिधींची कोंडी होण्याची चिन्हं आहेत.

भुजबळ यांनी विचारलं आहे की, "मराठा समाजाला ओबीसी आरक्षण हवं असेल, तर तुम्ही इतर सवलती आणि आरक्षण सोडायला तयार आहात का? एसईबीसीचे १० टक्के, ईडब्ल्यूएसचे १० टक्के आणि खुल्या वर्गातील आरक्षण नको का?" हा प्रश्न विचारताना त्यांनी थेट मराठा नेत्यांना लक्ष्य केलं आहे.

याचबरोबर, त्यांनी हेही स्पष्ट केलं की अशिक्षित लोकांकडून कोणतीही अपेक्षा नाही, परंतु सुशिक्षित मराठा समाजाने या प्रश्नाचं उत्तर द्यावं. म्हणजेच त्यांनी बाण थेट मराठा समाजातील सुशिक्षित नेते, माजी खासदार-आमदारांकडे वळवला आहे. दरम्यान, मनोज जरांगे यांच्यावरही भुजबळांनी टीका करताना "अशिक्षित" असा थेट उल्लेख केला. त्यामुळे आंदोलनकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर उमटण्याची शक्यता आहे.

भुजबळांच्या या नव्या मागणीमुळे मराठा समाजातील आजी-माजी लोकप्रतिनिधींना आता कठीण प्रसंगाला सामोरं जावं लागणार आहे. पुढील काही दिवसांत या प्रश्नावरून राज्यातील राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची चिन्हं आहेत.

## पोलीस भरतीसाठी वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांनाही संधी मिळणार

मुंबई, दि. १२ प्रतिनिधी

पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या राज्यातील तरुणांसाठी सरकारने गुडन्यूज दिली आहे. महाराष्ट्र पोलीस दलातील शिपायांची सुमारे १५ हजार पदे भरण्यात येणार असून त्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली होती. आता, या भरतीमध्ये सन २०२२ पासून २०२५ पर्यंत संबंधित पदाची विहित वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना आणखी एक वेळची संधी देण्यात येत आहे, विशेष बाब म्हणून या भरती प्रक्रियेसाठी उमेदवारांना अर्ज करता येणार आहे आणि भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. याबाबतचा शासन निर्णय गृह विभागाकडून जारी करण्यात आला आहे. त्यामुळे, भरतीची तयारी करणाऱ्या आणि वयोमर्यादा संपुष्टात आलेल्या उमेदवारांना ही नामी संधी आहे. राज्याच्या पोलीस दलात सन २०२४ दरम्यान रिक्त असलेली आणि २०२५ मध्ये रिक्त होणाऱ्या पदांचा आढावा घेऊन १५ हजार पदांची पोलीस भरती करण्यात येत आहे. पाच प्रकारच्या पदांसाठी ही भरती होणार असून त्याची जाहिरात प्रकाशित झाली आहे.

# 34 जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर

मुंबई, दि. १२ प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या हालचालींना वेग आला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापतींचे आरक्षण जाहीर झाले आहे. ग्रामविकास विभागाकडून अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. ३४ जिल्हा परिषद अध्यक्ष पदासाठीचे आरक्षण घोषित करण्यात आले आहे.

मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. नवी दिल्लीतील इंडिया इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर डेमॉक्रसी अँड इलेक्टोरल मॅनेजमेंट येथे या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत महाराष्ट्र जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सभापतींचे आरक्षण जाहीर करण्यात आले.

| आरक्षण |
|---|
| पालघर - अनुसुसूचित जमाती |
| रायगड- सर्वसाधारण |
| रत्नागिरी- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| सिंधुदुर्ग - सर्वसाधारण |
| नाशिक -सर्वसाधारण |
| धुळे -नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| नंदुरबार-अनुसूचित जमाती |
| जळगांव - सर्वसाधारण |
| अहिल्यानगर अनुसूचित जमाती (महिला) |
| पुणे -सर्वसाधारण |
| सातारा- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| सांगली - सर्वसाधारण (महिला) |
| सोलापूर - नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| कोल्हापूर- सर्वसाधारण (महिला) |
| छत्रपती संभाजीनगर -सर्वसाधारण |
| जालना - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| बीड - अनुसूचित जाती (महिला) |
| हिंगोली -अनुसूचित जाती |
| नांदेड - नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| धाराशिव - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| लातूर - सर्वसाधारण (महिला) |
| अमरावती - सर्वसाधारण (महिला) |
| अकोला - अनुसूचित जमाती (महिला) |
| परभणी - अनुसूचित जाती |
| वाशिम अनुसूचित जमाती (महिला) |
| बुलढाणा -सर्वसाधारण |
| यवतमाळ सर्वसाधारण |
| नागपूर - नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| वर्धा- अनुसूचित जाती |
| भंडारा - नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| गोंदिया - सर्वसाधारण (महिला) |
| चंद्रपूर - अनुसूचित जाती (महिला) |
| गडचिरोली -सर्वसाधारण (महिला) |

# महादेवी हत्तीण लवकरच परत येणार - राजू शेट्टी

जयसिंगपूर, दि. १२ प्रतिनिधी

माधुरी हत्ती नांदणी मठाकडे पाठविण्यासंदर्भात उच्च स्तरीय समितीने निर्णय घेण्यासंदर्भातचा निर्णय आज सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकार व मठाकडून करण्यात आलेल्या पुनर्विचार याचिकेवर देण्यात आला. यामुळे उच्च स्तरीय समितीकडे नांदणी मठाकडून अर्ज करून लवकरच माधुरी हत्ती परत आणणार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते व माजी खासदार राजू शेट्टी यांनी दिली.



शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात माधुरी हत्तीसंदर्भात न्यायमुर्ती जे. बी. पारडीवाला यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयासमोर राज्य सरकारचे वकील ॲड. धर्माधिकारी यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरून माधुरी हत्तीला वनतारा येथे पाठविण्यात आले आहे. तथापी राज्यामध्ये कायदा आणि सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने राज्य सरकारने वनतारा आणि नांदणी मठाशी समन्वय साधून मार्ग काढण्याचा प्रयत्न करून नांदणी मठाच्या स्वत:च्या जागेमध्ये वनताराच्या मार्गदर्शनाखाली अद्ययावत हत्ती पुनर्वसन केंद्र तातडीने उभा करून त्याठिकाणीच माधुरीवर पुढील उपचार करण्याचे ठरलेले आहे.

यावेळी पेटाच्या वकिलांनी माधुरी हत्तीची तब्येत खराब असल्याचे नमूद करून सध्या नांदणी मठामध्ये कोणत्याच सुविधा नाहीत, असे सांगण्याचा प्रयत्न केला. त्यावेळेस न्यायालयानेही उपलब्ध कागपत्रानुसार माधुरी हत्तीची तब्येत खराब असल्याचे मत व्यक्त करून मग तुम्ही माधुरीवर उपचार कसे करणार? असा प्रश्न उपस्थित केला.

याबाबत बोलताना राजू शेट्टी म्हणाले की, वनताराच्यावतीने सातत्याने माधुरी किती आनंदीत व तब्येत चांगली झाली असल्याचे व्हिडिओ वारंवार समाज माध्यमांवर सादर केलेले आहेत. यामुळे पेटाकडून हेतु पुरस्कर खोटा प्रसार केला जात आहे. सुनावणीस उपस्थित वनताराच्या वकीलांनी युध्दपातळीवर तातडीने नांदणी येथे पुनर्वसन केंद्रांची उभारणी करून उच्च स्तरीय समितीच्या देखरेखीखाली त्याठिकाणी माधुरीची सर्व काळजी घेणार असल्याचे सांगितले.

# १४ तारखेला आक्रमकपणे आंदोलन करा

## उद्धव ठाकरेंचे कार्यकर्त्यांना आदेश

मुंबई, दि. १२ प्रतिनिधी

आशिया क्रिकेट चषकात एकीकडे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याला हिरवा कंदील मिळाल्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतली आहे. पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मोदी सरकारला सवाल केल आहे. तर, आदित्य ठाकरे यांनीही भाजपवर निशाणा साधल्याचे पाहायला मिळाले. उद्धव ठाकरे यांनी विदर्भ आणि मराठवाड्यातील सर्व जिल्हाप्रमुखांची मातोश्रीवर बैठक घेतली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने त्यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपल्या भावनांशी खेळ केल्याचे सांगत भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यातील सामन्यावर भाष्य केलं.

भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामन्यावर बहिष्काराची मागणी करण्यात येत होती. काश्मीर खोऱ्यातील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचा हात असल्याचं उघड झालं. त्या हल्ल्यात २६ निष्पाप भारतीयांचा बळी गेला होता. त्यामुळे, भारतात पुन्हा एकदा पाकिस्तानविरुद्ध संताप व्यक्त होत असून भारत पाकिस्तान यांच्यात क्रिकेट सामना नको, अशी भूमिकाही काही राजकीय नेत्यांनी घेतली आहे. त्यामध्ये, शिवसेना ठाकरे गटानेही स्पष्ट भूमिका घेत भाजप आणि मोदी सरकावर हल्लाबोल केला.

पंतप्रधानांनी आपल्या भावनांशी खेळ केला, रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही असे मोदी म्हणाले. पण, आता रक्त वाहिल्यानंतर क्रिकेट खेळता? असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला. तसेच, सामन्यादिवशी येत्या १४ तारखेला आक्रमकपणे आंदोलन करा, महिला आघाडीने पंतप्रधानांना सिंदूर पाठवावा, असेही उद्धव ठाकरेंनी पदाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत. दरम्यान, भारत आणि पाकिस्तान यांच्यात येत्या रविवारी रात्री ८. वाजता क्रिकेट सामना रंगणार असून दुबईच्या मैदानावर क्रिकेट चाहत्यांसाठी ही पर्वणी असणार आहे. मात्र, या सामन्यावरुन राजकीय वातावरण तापल्याचं पाहायला मिळत आहे.

# याला नेपाळ, नागालँडकडे सोडा; जरांगे पाटलांचा पुन्हा छगन भुजबळांवर बोचरा पलटवार

जालना, दि. १२ प्रतिनिधी



ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी लातूर जिल्ह्यातील वांगदरी गावात जाऊन ओबीसी आरक्षणाच्या लढाईत आपला जीव दिलेल्या भरत कराड यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी, ओबीसी बांधवांना आवाहन करत कुणीही असे टोकाचे पाऊल उचलू नये, आधी आम्ही संपू, नंतर तुम्ही काय करायचे ते करा, असे म्हटले. तसेच, आरक्षणाच्या लढाईसाठी बलिदान देण्याची वेळ आपल्या बांधवावार आल्याचेही भुजबळ यांनी म्हटले होते. आता, छगन भुजबळांच्या लातूर दौऱ्यासंदर्भात बोलताना उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी जोरदार पलटवार केला आहे. तुझ्या आरक्षणावर कुणी अतिक्रमण केलंय, ह्याच्या ध्यानातच काही राहिना झालंय, आता हा विसरभोळा मंत्री झाला आहे. तो आता अंधश्रद्धा बाळगत आहे, असा पलटवार केला. तसेच, ह्याला तिकडं नेपाळ, नागालँडमध्ये सोडायला हवं, असेही जरांगे पाटील यांनी म्हटले.

तू ३२ टक्के खातो असा मंत्री देशात आहे का कुणी? आतापर्यंत याने आमचं आरक्षण खाल्लं आहे ते आम्ही परत घेत आहोत, गरीब ओबीसींनी हे समजून घ्यावे, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. आरक्षण रद्द करायचं आहे का? तू इतके दिवस खात होता ते रद्द करायचं आहे का? तू प्रगत झाला आहे. तू ते आरक्षण सोड ना. तुझं अजूनही पोट भरत नाही का? भरत्या, शिक्षण, सगळं यानेच खाल्लं आहे. राजकारणापायी हे ओबीसींना उलटे समजाऊन सांगत आहे. याचं ऐकू नका, हा मेटाकुटीला आला आहे. डोळे लाल दिसू नये म्हणून याने आज काळा चष्मा घातला आहे, याला आता यापुढे विसरभोळा मंत्री नाव द्यावे, असेही जरांगे पाटील यांनी म्हटलं.

मुंबईत येऊन हैदोस घातला असे भुजबळ यांनी म्हटल्याचा प्रश्न जरांगे पाटील यांनी विचारण्यात आला होता. त्यावर, याला देवाने अक्कल दिली असती तर बरं झालं असतं, मुंबईत मराठ्यांची पोरं गेली. महाराष्ट्राला एक संस्कृती दिसली, मुंबईचे खरे मालक ही पोरं होते, तिथले लोक पाहुणे आहेत. ह्यो इथं शोभत नाही, ह्या जनावराला नेपाळ, इकडे तिकडे सोडायला हवं, ह्याला नागालँड, इंग्लड अशा ठिकाणी सोडायला पाहिजे, अशा शब्दात जरांगे पाटील यांनी भुजबळांवर पलटवार केला. तसेच, महाज्योतीला यापूर्वी हजारो कोटी दिले तेव्हा आम्ही काही म्हणालो आहे का? सारथीला आता कुठे यायला लागले आहेत. वेडा वाकडा जीआर यानेच १९९४ साली काढायला लावला. मराठ्यांनी मर्दानगी दाखवून आतापर्यंत मिळवलं आहे, असेही पाटील यांनी म्हटले.

# बिजापूरमध्ये २ नक्षलवादी ठार २४ तासांत दुसरी मोठी कारवाई

बिजापूर, दि. १२ वृत्तसंस्था

छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यात शुक्रवारी (१२ सप्टेंबर) झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी आणखी दोन नक्षलवाद्यांना ठार केले. यासोबतच, गेल्या २४ तासांत सुरक्षा दलांना मिळालेले हे दुसरे मोठे यश आहे. यापूर्वी, गुरुवारी गरियाबंद जिल्ह्यात १० नक्षलवादी मारले गेले होते.

बिजापूर जिल्ह्यातील नैऋत्य भागात माओवाद्यांच्या हालचालीची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शोध मोहीम सुरू केली. या कारवाईदरम्यान, सकाळी सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये चकमक झाली. चकमकीच्या ठिकाणाहून आतापर्यंत २ माओवाद्यांचे मृतदेह जप्त करण्यात आले आहेत. तसेच, घटनास्थळावरून ३०३ रायफल आणि इतर शस्त्रे, स्फोटके आणि दैनंदिन वापराच्या वस्तूही जप्त करण्यात आल्या आहेत. ऑपरेशन अजूनही सुरू आहे असून, ते पूर्ण झाल्यानंतर अधिक माहिती समोर येईल.

गरियाबंद चकमकीत मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांमध्ये बंदी घातलेल्या सीपीआय (माओवादी) चा वरिष्ठ नेता आणि केंद्रीय समिती सदस्य (सीसीएम) मोडेम बालकृष्ण उर्फ भास्कर याचाही समावेश आहे. भास्करवर १ कोटी रुपयांचे बक्षीस होते. रायपूर प्रदेशाचे पोलिस महानिरीक्षक अमरेश मिश्रा यांनी सांगितले की, सुरक्षा दलांनी मैनपूर भागात झालेल्या चकमकीत किमान १० नक्षलवाद्यांना ठार मारले.

## ➤ महत्त्वाचे

### नासाका विद्यालयात आरोग्यविषयक मार्गदर्शन

**नाशिकरोड ।** पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात नाशिकरोड येथील वंदनीय बाळासाहेब ठाकरे (बिटको) हॉस्पिटलमधील एकात्मिक सल्ला आणि




चाचणी केंद्रातील समुपदेशक सुजाता जेजुरकर यांनी आरोग्यविषयक सखोल मार्गदर्शन केले. वैष्णवी पाटील आणि निर्मला रसाळ यांची उपस्थिती होती. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग आणि मुंबई येथील महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था यांच्या वतीने प्रशिक्षण संवेदीकरण शिबिरांतर्गत विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण पगार यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमात समुपदेशक सुजाता जेजुरकर यांनी एड्स, टीबी, गुप्तरोग अशा विविध आजारांबद्दल सखोल माहिती दिली. कोणताही आजार होऊ नये यासाठी घ्यावयाची दक्षता याविषयी मार्गदर्शन केले. तसेच चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श याबद्दलही उदबोधनही केले. शिक्षिका आशा चौधरी आणि सविता सानप-घुगे यांनी स्वागत केले.

### तिसरा जागतिक योग निद्रा उत्सव; नाशिकमध्ये विशेष आयोजन

**नाशिक ।** पूज्य आनंदमूर्ति गुरुमां यांच्या



प्रेरणा व मार्गदर्शनाखाली तिसरा जागतिक योग निद्रा उत्सव १४ सप्टेंबर रोजी जगभरात एकाच वेळी आयोजित केला जात आहे. भारताबरोबरच ब्रिटन, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दुबईसह ५० पेक्षा जास्त शहरांमध्ये हजारो साधक या दिवशी सामूहिकरित्या योग निद्राचा अनुभव घेणार आहेत. योग निद्रा हा प्राचीन योगिक सराव असून त्याला "योगिक निद्रा" असेही संबोधले जाते. पूर्ण शिथिलतेत सजग राहून अंतर्यात्रा घडविण्याची ही अद्वितीय पद्धत आहे. पूज्य गुरुमां यांनी आधुनिक जीवनशैलीसाठी या ध्यानपद्धतीला पुनर्जीवित करून सर्वसामान्यांसाठी सहज व सुलभ केले आहे. या सरावामुळे शरीराला गहन विश्रांती, मनाला शांती, भावनांना संतुलन, तसेच तणाव, नैराश्य व चिंता कमी होण्यास मोठी मदत होते. वैज्ञानिक अभ्यासातूनही योग निद्राचे परिणाम सिद्ध झाले आहेत.आयसीएमआर हैदराबादच्या राष्ट्रीय पोषण संस्थेत सात डॉक्टरांच्या टीमने, ऋषि चैतन्य ट्रस्टच्या सहकार्याने केलेल्या पायलट अभ्यासात असे स्पष्ट झाले की, नियमित योग निद्रा सरावामुळे रक्तदाब नियंत्रित राहतो, स्मरणशक्ती तीक्ष्ण होते, मानसिक आरोग्य सुधारते आणि कॉर्टिसोल व ट्रायग्लिसराइड्ससारख्या हानिकारक घटकांचे प्रमाण कमी होते. गेल्या दोन वर्षांपासून हा उत्सव भारतात राष्ट्रीय पातळीवर साजरा होत होता. यूट्यूबवर गुरुमांजींच्या योग निद्रा सत्राचा सराव करणाऱ्यांची संख्या १ कोटींवर पोहोचली आहे. या पार्श्वभूमीवर नाशिकमध्येही विशेष योग निद्रा सत्र आयोजित करण्यात आले आहे. स्थळ- श्री शंकराचार्य संकुल, ओल्ड गंगापूर नाका, गंगापूर रोड, नाशिक, रविवार, दि.१४ सप्टेंबर सकाळी ११:०० वाजता या सत्रासाठी नोंदणी पूर्णपणे विनामूल्य आहे. मात्र आसनसंख्या मर्यादित असल्याने इच्छुकांनी पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी संपर्क- ९३७२००९१२२. ऋषी चैतन्य व्हिजन, नाशिकतर्फे आयोजित या कार्यक्रमामुळे नाशिककरांना सामूहिक ध्यानाचा अनुभव घेण्याची अनोखी संधी लाभणार आहे.

# एसएमबीटी आयुर्वेद हॉस्पिटलला एनएबीएच मानांकन

**नाशिक ।** जिल्ह्यातील आणि इगतपुरी तालुक्यातील एसएमबीटी आयुर्वेद हॉस्पिटलला नुकतेच नॅशनल ॲक्रिडेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स ॲण्ड हेल्थकेअर प्रोव्हायडर्स (एनएबीएच) मानांकन प्राप्त झाले. 'एनएबीएच'ची मान्यता प्राप्त करणे या हॉस्पिटलमध्ये झालेल्या काळानुरूप बदलाची पावती असून दर्जेदार रुग्णसेवा आणि सुरक्षितता प्रदान करण्याच्या हॉस्पिटलच्या वचनबद्धतेचा हा दाखला असल्याचे वैद्यकीय संचालक तथा प्राचार्य डॉ. प्रदीप भाबड यांनी सांगितले. एनएबीएच मानांकन प्राप्त झाल्यानंतर ते संवाद साधत होते.

ते म्हणाले, 'एनएबीएच'ची मान्यता हे आरोग्य सेवेच्या गुणवत्तेसाठी राष्ट्रीयस्तरावर मान्यताप्राप्त मानाकंन आहे. ही मान्यता मिळणे हा कुठल्याही हॉस्पिटलसाठी मोठा सन्मान समजला जातो. एनएबीएचची मान्यता प्रक्रिया खूप खडतर आणि सर्वसमावेशक असते. यात रुग्णांची काळजी सुरक्षितता आणि संस्थांत्मक कार्यक्षमतेसह विविध क्षेत्रांमध्ये रुग्णालयाच्या कामगिरीचे मूल्यांकन केले जाते. एसएमबीटी आयुर्वेद हॉस्पिटलमध्ये या सर्व मापदंडामध्ये उत्कृष्टतेची वचनबद्धता दाखवून ही मान्यता प्राप्त केली असून आयुर्वेद आरोग्य क्षेत्रात एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. त्याअनुषंगाने, रुग्णालयात एनएबीएच नियमानुसार ०४ अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, सुसज्ज प्रसुतीगृह, अत्याधुनिक आय.सी.यू विभाग, सेंटर ऑफ क्लिनिकल एक्सलन्सच्या आधारे वेगवेगळ्या विभागांची नियोजनबद्द रचना केली आहे. सध्या हॉस्पिटलमध्ये एकुण २४४ बेड्स उपलब्ध असून विशेष म्हणजे, येथील राहत या पॅलीएटिव्ह केअरच्या माध्यमातून ३० बेड्स आरक्षित ठेवण्यात आले आहेत. याठिकाणी दुर्धर आजाराने खिळलेल्या रुग्णांवर विशेष वेदनाशामक उपचार केले जातात. या पॅलीएटिव्ह केअर युनिटमध्ये कार्यरत असलेला सपोर्टिंग स्टाफ हा टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल, मुंबई येथून प्रशिक्षण घेऊन आलेला आहे. त्यामुळे रुग्णांवर अभ्यासपूर्ण आणि योजनाबध्द उपचार केले जातात. यापुढे एनएबीएच मानांकनामुळे सर्व सरकारी व निमसरकारी शासकीय आरोग्य योजना राबवता येणे सहज शक्य असल्याचेही प्रतिपादन करण्यात आले.







### रुग्ण सुरक्षा व दर्जेदार उपचारांवर भर

आमच्या दीर्घकालीन गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवेच्या व रुग्ण-केंद्रित दृष्टिकोनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे एनएबीएच (NABH) मानांकन मिळणे शक्य झाले. अनेक वर्षांपासून रुग्ण सुरक्षा व दर्जेदार उपचार यावर आम्ही सातत्याने काम करत आलो आहोत. संस्था व्यवस्थापनाने सर्वांना यासाठी वेळोवेळी प्रेरणा दिली. गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठीच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी केल्याने यशाला गवसणी घालता आली.

**- डॉ. प्रदीप भाबड, वैद्यकीय संचालक तथा प्राचार्य, एसएमबीटी आयुर्वेद हॉस्पिटल**

### एनएबीएच मानांकन का गरजेचे?

नॅशनल ॲक्रिडेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स अँड हेल्थकेअर प्रोव्हायडर्स (NABH) ही भारतीय गुणवत्ता परिषदेची एक घटक आहे. याची स्थापना आरोग्य सेवा संस्थांसाठी मान्यता प्रदान करणे व संचालित करणे यासाठी करण्यात आली आहे. एनएबीएच मंडळाचे कार्य स्वायत्त आहे. आरोग्य सुविधांच्या मान्यतेसह ही संस्था कुशल सहकर्मचारी घडविण्यास प्रोत्साहन देत असते. प्रयोगशाळा प्रमाणीकरण उपक्रम राबविते, गुणवत्ता आणि रूग्णांच्या सुरक्षिततेसाठी नियमितपणे विविध शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यशाळा, व्याख्याने आयोजित करीत असते.

# पिंपळनेर नगरपरिषद हद्दीत प्रत्येक घराला क्यूआर कोड बसविण्यास प्रारंभ

### एका क्लिकवर मिळणार कचरा संकलनाची माहिती

**पिंपळनेर ।** स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत पिंपळनेर नगर परिषदेमार्फत नगरपरिषद हद्दीत प्रत्येक घराला क्यूआर कोड बसविण्याची मोहीम युद्धपातळीवर सुरू झाली आहे.

महाराष्ट्र शासनाद्वारे निर्गमित शासन निर्णयाच्या अनुषंगाने दैनंदिन घनकचरा संकलनाच्या मॉनिटरींगसाठी पिंपळनेर शहरात आयसीटी बेस्ड प्रणाली कार्यरत करण्यात आली आहे, या अंतर्गत शहरातील नागरिकांद्वारे ओला व सुका कचरा साठविण्यासाठी प्रत्येक घराला डस्टबिनसाठी विशिष्ट क्यूआर कोड लावले जात आहेत. कचरा संकलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांद्वारे कचरा घेतल्यानंतर कोड स्कॅन केले जातील.यापूर्वीच परिषदेमार्फत कचरा संकलन करण्यासाठी घंटा गाडी नियमितपणे






येत होती मात्र आता त्यात पुन्हा पारदर्शकता येण्यासाठी नगरपरिषद प्रशासनाकडून संचालनालयामार्फत नियुक्त कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून गुरुवारी ११ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता प्रभाग ९ मधील प्रत्येक घराच्या बाहेर क्यूआर कोड बसविण्यास प्रारंभ केला आहे. यामुळे यापुढील काळात कचरा संकलनासाठी येणारे कर्मचारी प्रत्येक घरापर्यंत पोहोचून कचरा संकलन करणार आहेत.सदर माहिती संकलन क्यूआर कोडच्या माध्यमातून प्रशासनाला एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. आगामी काळात शहरात सर्वत्र क्यूआर कोड बसविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रशासनाकडून संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे त्यानंतर ही यंत्रणा सुरू होणार आहे. अशी माहिती पिंपळनेर नगर परिषदेचे मुख्याधिकारी दीपक पाटील यांनी दिली आहे.

# दिंडोरी शेतकरी सहकारी संघाची ६६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

सुनिल घुमरे

दिंडोरी | दिंडोरी येथील शेतकरी सहकारी संघाची ६६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पोपटराव जाधव संकुल येथे संघाचे चेअरमन बाळकृष्ण जाधव यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सभेच्या प्रारंभी दिवंगत मान्यवर व सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर सचिव संजय जाधव यांनी मागील सभेचे इतिवृत्त तसेच विषयांचे वाचन केले.

सभेत वार्षिक अहवाल, आर्थिक पत्रक, ऑडिट मेमो, सन २०२५-२६ चे अंदाजपत्रक सादर करून मंजुरी घेण्यात आली. तसेच लेखा परीक्षकांची नेमणूक आणि संघाच्या इमारतीवर बहुउद्देशीय शेड उभारणी या महत्त्वाच्या ठरावांनाही सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. सभेदरम्यान व्यासपीठावर व्हा. चेअरमन राहुल जाधव, संचालक रामभाऊ ढगे, रामदास पिंगळ, भरत कड, गुलाबतात्या



जाधव, दिलीप जाधव, रघुनाथ पाटील, रघुनाथ गायकवाड, सुरेश घुमरे, संतोष कथार, सुनील मातेरे, धर्मराज राऊत, सौ. मीना मवाळ, सौ. सुमन धुमने, स्वीकृत संचालक नामदेव घडवजे, दिनकर जाधव, नवनाथ नाठे, शशिकांत गामणे, वाळू जगताप, बाळासाहेब महाले, प्रकाश पिंगळ, गणेश हिरे तसेच सचिव संजय जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. वार्षिक सभेसाठी कादवा संचालक मधुकर गटकळ, माजी नगराध्यक्ष भाऊसाहेब बोरस्ते, कृउबा समिती उपसभापती योगेश बर्डे, माजी सैनिक संघाचे अध्यक्ष भारत खांदवे, सी. ए. समाधान अपसुंदे, रमेश मवाळ, बाळासाहेब घुमणे, कैलास पाटील, विलासराव देशमुख, वसंत थेटे, कैलास कळमकर, सचिन बर्डे, बाबा मोरे, सुनील पेलमहाले, विलास वडजे, अनिल अपसुंदे, अशोक पताडे, विजय पिंगळ, अजित कड, भगवान जाधव आदींसह संचालक मंडळ व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेत चर्चेदरम्यान योगेश बर्डे, कैलास जाधव यांनी सहभाग घेतला. त्यांनी शेतकरी संघाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले. तसेच काही विधायक सूचना मांडल्या. सभासदांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांना चेअरमन बाळकृष्ण जाधव यांनी समर्पक उत्तरे देत शेतकरी सहकारी संघाच्या प्रगतीविषयी सविस्तर माहिती दिली.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जन्मदिवस सेवा पंधरवाडा साजरा होणार

**पेठ ।** देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन व महात्मा गांधी यांची जयंती असा १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर हा सेवा पंधरवाडा म्हणून महसूल विभागाच्या वतीने साजरा करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार आशा गांगुर्डे यांनी दिली.

महसूल विभागाच्या वतीने हा सेवा पंधरवाडा तीन टप्प्यात राबविण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात शिव पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण करणे,पाणंद रस्त्याची नोंद,गाव नकाशावर चिन्हांकित करणे, निस्तार पत्रक वाजिब उल अर्जामध्ये नोंद करणे ,शेत रस्त्यासाठी समंती घेणे,रस्ता अदालतीत प्रलंबित शेतरस्ते निकाली काढणे,शेत रस्त्यांचे सीमां मोजणी करणे, भूमी अभिलेख यांच्या समन्वयातून पाणंद रस्ते मोजणी कार्यक्रम राबविणे, दुर-या टप्प्यात ग्रामीण रस्ते,हद्दीचा ग्रामीण रस्ते,ग्रामीण गाडीमार्ग, पायमार्ग, शेतावर जाणारे पायमार्ग गाडीमार्ग , तिस-या टप्प्यात ग्रामीण रस्त्याची यादी तयार करून सीमांकण करून रस्त्यांची एकत्रित नोंद करणे प्रत्येक रस्त्यावर संकेतांक निश्चित करणे स्मशानभूम,आयुष्मान कार्ड,स्वच्छता अभियान महसूल आदालत वनपट्टे वाटप आदी सह छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियनांतर्गत सेवा पंधरवाडा पेठ तालुक्यात गावपातळीवर प्रभावी पणे राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आवाहन तहसील कार्यालयात झालेल्या बैठकीत तहसीलदार आशा गांगुर्डे (संघवी) यांनी केले.

यावेळी नायब तहसीलदार दिपक गोवर्धने पी. आर. सोनवणे, रामकिसन राठोड,अमर म्हात्रे मुख्याधिकारी चेतन विसपुते, गटविकास अधि. भुमिअभिलेखचे भोये भाजपा तालुकाध्यक्ष पंकज पाटील, रामदास वाघेरे, विलास जाधव, याकुब शेख, चंद्रशेखर काळे ,आशोक गवळी ,कैलास गारे ,काशिनाथ भंडांगे आदी उपस्थित होते.

# जीएसटीमधील बदलामुळे सर्वसामान्यांना दिलासा : उपाध्ये


**नाशिक ।** भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी आज पत्रकार परिषदेत महत्त्वाचे मुद्दे मांडले. उपाध्ये म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्या जीएसटी बदलांची घोषणा केली होती, ते आता प्रत्यक्षात उतरले आहेत. या निर्णयामुळे सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा मिळणार असून जीवनावश्यक वस्तू कमी दरात उपलब्ध होणार आहेत. यामुळे लोकांचे स्वप्न पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

देशाची अर्थव्यवस्था २०१४ पूर्वी विकलांग अवस्थेत होती, मात्र मोदी सरकार आल्यापासून ती महाशक्ती होण्याकडे वाटचाल करत आहे. जीएसटी बदलांचा लाभ सर्व राज्यातील लोकांना मिळणार असून नागरिक मोठ्या प्रमाणावर याचे स्वागत करत आहेत. मात्र पेट्रोल-डिझेल जीएसटीत समाविष्ट नसल्याने त्याबाबतचा निर्णय नंतर घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. मनसे-ठाकरे युतीबाबत बोलताना उपाध्ये म्हणाले की, दोन भाऊ एकत्र येत असतील तर ते कौटुंबिक प्रकरण आहे. मात्र विकासाच्या मुद्यावर मतदार भाजपलाच मतदान करतील. मराठा समाजाचे आरक्षण गेल्या ४० वर्षांची मागणी होती, ती देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण केली आणि कोर्टात देखील टिकवली. काही अतृप्त आत्मे कोर्टात जात असले तरी सरकार ठामपणे या प्रश्नावर उपाय करेल, असे त्यांनी सांगितले. तर नेपाळमधील घटनेवरून संजय राऊत यांनी केलेल्या ट्विटवर उपाध्ये म्हणाले की, लोकशाही मानणारा माणूस असा विचार करूच शकत नाही. नेपाळसारखी घटना भारतात घडावी अशी इच्छा करणाऱ्यांचा खरा चेहरा आता जनतेसमोर आला आहे. भारतातील जनता समृद्ध आहे आणि लोकशाही मजबूत आहे, असेही ते म्हणाले.

# स्व. प्रा. सूर्यकांत रहाळकर : एक शिक्षण प्रेमी, शिक्षण तज्ज्ञ

दि. १ एप्रिल १९२३ ते आजपर्यंत, म्हणजे या १०२ वर्षांच्या काळात नाशिक एज्युकेशन सोसायटीने अनेक स्थित्यंतरे अनुभवली. संस्थेला माजी विद्यार्थ्यांची फार मोठी परंपरा आहे . आजपर्यंत संस्थेने अनेक कठीण प्रसंगांना तोंड दिले. परंतु, वेळोवेळी लाभलेले उत्साही, धैर्यशील, कर्तृत्ववान संस्थाचालक तसेच व्यासंगी, अनुभव संपन्न आणि स्वतःला झोकून देऊन, त्यागमय जीवन व्यतीत करणाऱ्या शिक्षकांमुळे आणि पुढे नामवंत व कर्तृत्ववान माजी विद्यार्थ्यांमुळे संस्था आणि शाळा प्रगतीकडे वाटचाल करू शकली. नाशिक एज्युकेशन सोसायटीला अध्यक्षांच्या रूपाने लाभलेला वारसा खूप मोठा आहे. प्रथम पासून लाभलेल्या अध्यक्षांनी त्यांच्या कार्यकाळात निस्पृहपणे, सचोटीने संस्थेची धुरा सांभाळली. सतत कार्यमग्न असणारे कै.वसंतराव गुप्ते, प्रत्येक काम वेळेत होण्यासाठी प्रयत्नशील असणारे कै. एम.जे. तथा बाबासाहेब दीक्षित, लोकप्रिय खासदार कै. गो.ह. देशपांडे, अत्यंत काटेकोरपणे कार्यशैली असलेले कै.अण्णासाहेब वैशंपायन, सौजन्यशील मार्गदर्शक कै.ग.ज.म्हात्रे, सहकारातील अग्रणी कै. बाबुशेठ राठी, साहित्यिक कै.डॉ.अ.वा. वर्टी, दूरदृष्टी असणारे कै.बापूसाहेब उपाध्ये, कै. नानासाहेब प्रधान, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कै. मधुकर तोष्णिवाल, सुप्रसिद्ध हृदयविकार तज्ज्ञ डॉ.श्रीकांत केळकर या सर्व ज्येष्ठांचा आदर्श वारसा पुढे चालवत, संस्थेला परंपरांचे जतन करून आधुनिक दृष्टी प्रदान करणारे स्व.अध्यक्ष प्रा.सूर्यकांत रहाळकर !

माजी विद्यार्थी ते संस्था अध्यक्ष अशा विविध भूमिकांमधून नाशिक एज्युकेशन सोसायटीशी जवळपास ५० वर्षांपेक्षाही जास्त काळ संबंध प्रा. रहाळकर यांचा आला आहे. विशेष म्हणजे संस्थेत नोकरी न करता सेवाभावी वृत्तीने हा संबंध त्यांनी जतन केला. नाशिक एज्युकेशन सोसायटी या मातृसंस्थेवर त्यांची नितांत श्रद्धा होती. १५ नोव्हेंबर १९५० रोजी कै. काकासाहेब रहाळकर यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. जन्मतःच अत्यंत तेजस्वी या पुत्राचे नामकरण सूर्यकांत असेच करण्यात आले. लहानपणापासूनच ते अत्यंत कुशाग्र बुद्धीचे होते. तसेच अभ्यासात एकपाठी होते. नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शिक्षण मंदिर पासून ते पेठे विद्यालयात मॅट्रिक म्हणजे अकरावी पर्यंतचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. शाळेत त्यांना उत्तमोत्तम शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. तसेच बुद्धिकौशल्य, चातुर्य, सभाधीटपणा याचे संस्कार त्यांना परंपरेने प्राप्त झाले. शाळेत चित्रकला विषयात त्यांना विशेष आवड आणि प्रगती होती. घर आणि शाळेतील पोषक वातावरण यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा उत्तम विकास झाला. पेठे विद्यालयाचा तो सुवर्णकाळ उत्कर्षाचा, प्रगतीचा होता.अभ्यासाबरोबर सर्वांगीण विकासासाठी आवश्यक व्यवहार कौशल्याचे संस्कार शिक्षकांकडून त्यांचेवर झाले. वाचनाबरोबरच लेखनाची आवड निर्माण झाली. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे शिस्त आणि संस्कार तसेच जिव्हाळा, नातेसंबंध तसेच एकतेचा संस्कार त्यांच्यावर झाला. त्यातून त्यांच्या अध्यात्मिक ज्ञानाची कक्षा रुंदावल्या. एकत्र कुटुंब पद्धती मुळे जनसंपर्क आणि नातेसंबंध टिकून ठेवण्याच्या संस्कार त्यांच्यावर झाला. वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा त्यांनी



गाजवल्या. महाविद्यालयीन जीवनात ते युथ न्यूज नावाचे मॅगझीन चालवायचे .त्या काळात तरुणांना या मॅगझीनने भुरळ पाडली. विविध विद्यार्थी संघटनांनी सरांना नेतृत्व करण्यासाठी गळ घातली. परंतु, कोणत्याही संघटनांच्या चौकटीत अडकून पडण्याचा त्यांचा स्वभाव नसल्याने त्यांनी ते नाकारले. पुढे गोखले एज्युकेशन सोसायटीतून एम. बी. ए. पदवी संपादन केली. त्याप्रसंगी डॉ. मो. स. गोसावी यांच्याशी त्यांचा संपर्क आला. शिक्षण घेत असताना त्यांच्यातील नेतृत्व गुणांमुळे, त्यांच्या सार्वजनिक जीवन कार्याला सुरुवात झाली. वर्तमानपत्रात सतत वैचारिक,अध्यात्मिक इ.विषयांवर सातत्याने ते लेखन करीत. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र शासनाच्या पब्लिसिटी डिपार्टमेंट मध्ये वर्ग १ पदाकरिता आवश्यक परीक्षा ते उत्तीर्ण झाले. परंतु शासकीय नोकरी करून सार्वजनिक कार्यात काम करता येणार नाही, हे लक्षात आल्यावर त्यांनी नोकरी करणे पसंत केले नाही. पुढे त्यांनी विधी शाखेतील पदव्युत्तर पदवी मिळविली. तरुणांशी संपर्क रहावा व ज्ञान साधना करता यावी याकरिता गोखले एज्युकेशन सोसायटीच्या एच.पी.टी. महाविद्यालयातील मार्केटिंग विभागात प्राध्यापकाची नोकरी त्यांनी स्वीकारली. नोकरी सांभाळून पारंपरिक व्यवसाय सर सांभाळत. अमोघ वक्तृत्वाच्या गुणांमुळे ते समोरच्याला लगेच आपलेसे करायचे. नाशिकमधील पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक म्हणून बँकेला उर्जितावस्था मिळवून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्थापन केलेली, अभिनव भारत संघटनेची नाशिक मधील जबाबदारी डॉ. केतकर यांच्या मुळे प्रा.रहाळकर सरांवर आली. या संघटनेचे कार्य त्यांनी पुढे सुरू ठेवले. नाशिक मधील मोजक्याच परंतु महत्त्वपूर्ण संस्थांचे नेतृत्व सरांनी केले. चित्पावन ब्राह्मण संघ, पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक, सिद्धिविनायक नागरी सहकारी पतसंस्था, नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, विश्वास को ऑपरेटिव्ह बँक, कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक, जनलक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक या सारख्या सहकार क्षेत्रातील नामवंत संस्थांचे संचालक, सदस्य आणि मार्गदर्शक म्हणून सरांनी अतिशय उत्तम काम पाहिले. नाशिकमधील रविवार कारंजा मित्र मंडळाच्या स्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला. रविवार पेठेतील नाशिककरांचे श्रद्धास्थान असलेल्या चांदीचा गणपती मूर्ती प्रतिष्ठापना सरांच्या पुढाकाराने झाली आहे. तसेच धर्मार्थ दवाखाना गोरगरीबांच्या सेवेकरिता संस्थेच्या माध्यमातून उभारला आहे. नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड, रेड क्रॉस सेवाभावी संस्था, प्रज्ञासा सेवाभावी संस्था यांच्या माध्यमातून सर सामाजिक सेवा करायचे. गरजू, अडचणीत असलेल्यांना हक्काची जागा म्हणजे प्रा.रहाळकर सर ! सहजासहजी कोणाला रिकाम्या हाताने त्यांच्याकडून परत जावे लागत नाही. अनेकांना योग्य मार्गदर्शन करीत अनेक कुटुंबांचा उद्धार त्यांनी केला आहे.होतकरू तरुणांना योग्य मार्गदर्शन त्यांच्याकडून मिळते. अनेकांना शिक्षणासाठी आर्थिक मदत ते करीत असतात. परंतु,केलेल्या मदतीची वाच्यता फारशी केलेली त्यांना आवडत नाही. धर्म आणि जातीपातीच्या बेडयांमध्ये ते कधी अडकले नाही. त्रंबकेश्वर रस्त्यावरील अनाथाश्रमाला नित्यनेमाने ते दानधर्म करीत असे. १९८४ ते १९९९ पर्यंत सर नाशिक एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यापूर्वी ते काही वर्षे संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य होते. संस्थेच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या विकासासाठी अनेकविध योजना सरांच्या मार्गदर्शनाने राबविल्या गेल्या. आपली संस्था बहुजनांना शिक्षण देण्यासाठी स्थापन केलेली आहे, असे सर नेहमी सांगतात. समाजातील गरीब लोकांपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे. यासाठी ते प्रयत्नशील असे. याच अंतःप्रेरणेतून आश्रमशाळा वेळुंजेची स्थापना झाली. परिसरातील दहा बारा पाडे आणि वस्त्यांवरील विद्यार्थ्यांना निवासी राहून शिक्षण घेण्याची सोय या शाळेमुळे झाली. शिक्षक आणि विद्यार्थी हितासाठी सर कायम तत्पर असायचे. सरांनी विविध कंपन्यांचे सी.एस.आर.निधी संस्थेसाठी मिळविला. कोरोना महामारीच्या काळात त्यांनी कुटुंब प्रमुखांच्या भूमिकेतून सर्व शिक्षक कर्मचारी आणि कुटुंबीयांची काळजी घेतली. शक्य तेवढ्या लोकांना फोनवर संपर्क करून मानसिक आधार दिला.अनेकांना आर्थिक मदत केली. हॉस्पिटल बेड उपलब्ध करून दिले. स्वतःचे वय विसरून इतरांसाठी कोरोना काळात ते आधारस्तंभ बनले. शिक्षक कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी म्हणून त्यांनी संस्थेच्या खर्चातून सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांच्या कोविड चाचण्या करून घेतल्या. शाळा समाजाचा आरसा असतो. विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याची जबाबदारी शाळांनी नाकारून चालणार नाही, असे मानून विद्यार्थ्यांकरिता विविध उपक्रम राबविण्यासाठी ते सर्वांना प्रेरित करायचे. सामाजिक कार्याच्या जाणिवेतून ते स्काऊट-गाईड चळवळीत सहभागी व्हायचे. नाशिक भारत स्काऊट आणि गाईड या संस्थेचे उपाध्यक्ष पद तसेच राज्य कार्यालयाचे आयुक्त म्हणून सर कार्यरत होते.त्यांनी केलेल्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील कार्याचा गौरव आजवर अनेक संस्थांनी केला आहे. अनेक पुरस्कारांनी प्रा. रहाळकर सरांच्या कार्याची दखल घेतली आहे. ज्या व्यक्तीची वाणी गोड असते. ज्याचे कार्य परिश्रमाने भरलेले असते. ज्याचे धन दानासाठी उपयोगात आणले जाते. त्या व्यक्तीचे जीवन सफल असते. असे सफल व संपूर्ण आयुष्य प्रा. रहाळकर सर यांनी व्यतीत केले आहे. नाशिक जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात खूप मोठी पोकळी निर्माण झाली आहे.१३ सप्टेंबर २०२५ द्वितीय पुण्यस्मरणा निमित्त घेतलेला आढावा. सरांना भावपूर्ण आदरांजली!

**- उमेश कुलकर्णी, सहकार्यवाह, नाशिक एज्युकेशन सोसायटी, नाशिक**

> महत्त्वाचे

## मनमाडसह आठ रेल्वे स्थानकात विशेष तिकीट तपासणी मोहीम

**मनमाड ।** रेल्वे प्रशासनाच्या वतीने भुसावळ विभागातील मनमाडसह भुसावळ, नाशिक, खंडवा, अकोला, जळगाव, बडनेरा आणि अमरावती या आठ प्रमुख स्थानकांवर



दिनांक १० सप्टेंबर २०२५ रोजी विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. बिनतिकीट व अनियमित प्रवास करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे आणि प्रवाशांमध्ये जागरूकता निर्माण करणे, या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत एकूण ६३ तिकीट तपासणी कर्मचारी आणि वाणिज्य पर्यवेक्षक सहभागी झाले होते. तसेच ८ रेल्वे सुरक्षा बल (RPF) कर्मचारी यामध्ये सहभागी होते. मोहीमेदरम्यान एकूण ३९१ प्रकरणांमध्ये बिनतिकीट प्रवासी, अनियमित तिकीटधारक व बीना बुक सामान घेऊन प्रवास करणाऱ्यांचे प्रकार आढळून आले. या कारवाईतून एकूण ₹,५२,४८०/- इतकी रक्कम दंड स्वरूपात वसूल करण्यात आली. याशिवाय ३ प्रकरणांची नोंद करण्यात आली असून ७ प्रकरणांमध्ये कारवाई करून ९००/- दंड वसूल करण्यात आला. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना आवाहन केले आहे की, त्यांनी योग्य आणि वैध तिकीट घेऊनच प्रवास करावा, जेणेकरून कोणतीही असुविधा किंवा दंडाची वेळ येणार नाही. तिकीटशिवाय प्रवासाबाबत रेल्वेचे शून्य-सहनशील धोरण कायम असून, प्रवाशांना सुरक्षित, सुसंवाद आणि सन्मानपूर्वक प्रवासाची हमी देण्याचा रेल्वे प्रशासनाचा प्रयत्न आहे.

## वाजे विद्यालयातील शिक्षिका प्रिती पवार यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**सिन्नर ।** येथील लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयातील विज्ञान विषयाच्या शिक्षिका प्रिती पवार - खैरनार यांना लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटी यांचा मानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार




प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार आंतरराष्ट्रीय स्तरावर सेवाभावी कार्य करणाऱ्या लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटी तर्फे देण्यात आला. सदर सोहळा गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर येथे नुकताच संपन्न झाला. याप्रसंगी पुरस्काराचे वितरण लायन्सचे अध्यक्ष उद्योजक बबन वाजे, हेमंत वाजे, डॉ. विजय लोहारकर, मनीष गुजराथी, डॉ. गणेश पाटील, अपर्णा क्षत्रिय, सचिव जयवंत काळे, खजिनदार प्रशांत शिंदे, प्राचार्य एन. यू. पाटील तसेच प्रमुख पाहुणे प्राचार्य सानप यांचे शुभहस्ते झाले. याप्रसंगी लायन्सचे सदस्यांसह अमोल खैरनार उपस्थित होते. या प्रसंगी पवार म्हणाल्या की अशा पुरस्कारामुळे काम करण्यास उत्साह वाढतो. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, संचालक कृष्णाजी भगत, मुख्याध्यापक रायते, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी, प्रा. जयंत महाजन, लेखक प्रा. संजय पवार, सुनिता पवार, स्वाती डेरे, कीर्ती पवार, लता पवार यांनी अभिनंदन केले.

## पिंपळनेर तालुका संघटनेतर्फे डॉ. जितेश चौरे यांना 'हृदयनाथ पुरस्कार २०२५' प्रदान

**पिंपळनेर ।** पिंपळनेर तालुका पत्रकार संघटनेतर्फे प्रसिद्ध हृदयरोग रोग तज्ञ डॉ.जितेश चौरे



यांना 'हृदयनाथ पुरस्कार २०२५' देऊन गौरविण्यात आले. पिंपळनेर शहरात १७ वर्षा पूर्वी हृदय रोग तज्ञ डॉ. जितेश चौरे यांनी "सुहरी हॉस्पिटलच्या "माध्यमातून आरोग्य सेवेला प्रारंभ केला.त्या काळात पिंपळनेर व परीसरातील जनतेला मधुमेह, हृदय विकार इत्यादी उपचारासाठी धुळे,नाशिक, मुंबई, पुणे येथे जावे लागत होते.मात्र पिंपळनेरचे भुमी पुत्र डॉ.जितेश चौरे यांनी एम.बी.बी.एस,एम. डी.झाल्यानंतर आपण जनतेच देणं लागतो.म्हणुन पिंपळनेर ला आपली वैद्यकीय सेवा सुरू केली. ऊत्तमसेवा देत आज सुहरी हॉस्पिटलला १७ वर्ष पुर्ण झाले.वर्धापन दिनाचे औचित्य साधत त्यांच्या कार्याची दखल घेत पिंपळनेर तालुका पत्रकार संघटनेतर्फे त्यांना "हृदयनाथ पुरस्कार २०२५" शाल, श्री फळ, स्मृती चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पिंपळनेर तालुका पत्रकार संघटनेचे अध्यक्ष सुभाष जगताप,प्रा.एस.डी. पाटील,प्रा.शिवप्रसाद शेवाळे, भिलाजी जिरे, चंद्रकांत घरटे, दिलीप बोळे,भरत बागुल,अनिल बोराडे, विशाल बेनुस्कर,हरीष जगताप ,रविंद्र मराठे, रविकिरण बोरसे,अमोल पाटील आदी उपस्थित होते.

# मनसे-शिवसेनेच्या संयुक्त जनआक्रोश मोर्चाने वेधले नाशिककरांचे लक्ष

## नाशिक ब्लॅकआऊट... अंधाराकडून उजेडाकडे जाण्यासाठी रस्त्यावर










### शहरातील गुन्हेगारी झाली वलयांकित

मनसे आणि शिवसेनेच्या ठाकरे गटाने काढलेल्या जनआक्रोश मोर्चामुळे शहरातील गुन्हेगारीचा विषय चांगलाच वलयांकित झाला आहे. या दोन्ही पक्षांनी गुन्हेगारीचा मुद्दा वलयांकित करीत त्याच्या विरोधात रस्त्यावर उतरत रान पेटविल्याने जनसामन्यांच्या जणू भावनेला हात घातला आहे. राहूल धोत्रे खून प्रकरण मोर्चात उचलून धरण्यात आले. गुन्हेगारी वृत्तीचा भाजप पाठीशी घालत असल्याचा स्पष्ट आरोप मोर्चेकऱ्यांनी केला आहे. येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा जनआक्रोश मोर्चा म्हणूनच लोकभावनेचा मुद्दा बनला असल्याची नागरिकात चर्चा आहे.

**नाशिक ।** मराठीच्या मुद्यावर एकत्र आलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने शुक्रवारी (दि. १२) नाशिकमध्ये संयुक्तपणे भव्यदिव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. महायुती सरकारच्या विरोधात लोकाश्रयाच्या बळावर रस्त्यावर उतरत दोन्ही पक्षांनी विविध मुद्द्यांवर रान पेटवित तीव्र निषेध नोंदविला.

शहरातील वाढलेल्या नागरी समस्या, रस्त्यांवरील खड्डे, नाशिक शहरातील वाढती गुन्हेगारी, महापालिकेतील अनागोंदी कारभार, सर्वत्र बोकाळलेला भ्रष्टाचार आदींसह राज्यात नव्हे तर देशात कुप्रसिद्ध झालेले हनीट्रॅप प्रकरण आदी मुद्द्यावर मनसे आणि शिवसेना (ठाकरे गट) आक्रमक झाले असून, त्याच्या निषेधार्थ हा संयुक्त जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. शहरात वाढलेल्या प्रचंड प्रमाणातील गुन्हेगारीमुळे जनसामान्य असुक्षित झाले आहेत. यावर वाचा फोडण्यासाठी वशिवसेना उबाठा गट आणि मनसे आक्रमक झाली असून, लोकांसाठी रस्त्यावर उतरली असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. येथील बी.डी. भालेकर मैदानावरून सकाळी ११ वाजता दोन्ही पक्षांचे पदाधिकारी, नेते आणि हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते जमा झाले. यावेळी विविध घोषणाबाजी करणारे फलक हाती घेऊन कार्यकर्ते मोर्चास्थळी येत होते. घोषणा आणि निषेधाच्या फलकांनी अनेक चित्ररथ तयार करण्यात आले होते. वाद्यांच्या गजरात दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते प्रचंड घोषणाबाजी करीत महायुतीच्या सरकारचा




निषेध करीत होते. साधारणपणे १२.३० वाजता जनआक्रोश मोर्चाला सुरुवात झाली. बी.डी. भालेकर मैदान येथून निघालेला हा मोर्चा गंजमाळ सिग्नलमार्गे दूध बाजार, मेनरोड, धुमाळ पॉईंट, महात्मा गांधी मार्ग, मेहेर सिग्नलमार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर नेण्यात आला. यावेळी दोन्ही पक्षाच्या संयुक्त शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ दोन्ही पक्षाच्या प्रमुख नेत्यांनी मार्गदर्शन केले. लोकांच्या प्रश्नांना मनसे आणि सेनाच वाचा फोडू शकते. त्यामुळेच दोन्ही पक्षांना लोकाश्रय मिळत असून, समाजाचे अनेक घटक दोन्ही पक्षांकडे येत असल्याचेही यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी शहरातील वाढती गुन्हेगारी अधोरेखित करीत सत्ताधारी भाजपवर निशाणा साधला. या जनआक्रोश मोर्चाला २५ हजाराहून अधिक कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले होते.

यावेळी दोन्ही पक्षांनी हनीट्रॅप घोटाळा, शेतकरी वचनभंग, महापालिकेतील भ्रष्टाचार, अवैध धंदे व सावकारी, स्मार्ट मीटर आणि खासगीकरण, डिजिटल फसवणूक, महिला सुरक्षा, कामगार व तरुणांवर होणारा अन्याय, बेरोजगारी, सिंहस्थ कुंभमेळा, आदिवासी पिळवणूक, प्रशासनातील सर्वव्यापी भ्रष्टाचार, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत भ्रष्टाचार, आयटी पार्क व मोठे प्रकल्प, सत्ताधारी पक्षातील गुन्हेगारांची पाठराखण, नाशिक मनपातील पदभरती, टोलनाके आदींसह अनेक नागरी समस्या, विकासकामे, सुविधा याचा जाब विचारण्यासाठी हा जनआक्रोश मोर्चा काढल्याचे सांगितले. आम्ही विरोधात आहोत. त्यामुळे आमचे कामच आहे सरकारवर अंकुश ठेवण्याचे, लोकांसाठी रस्त्यावर उतरल्याचे त्यांनी सांगितले. मनसे आणि शिवसेना (ठाकरे गट) यांच्यावतीने आयोजित

- मोर्चेकऱ्यांनी निषेध करणाऱ्या गांधी टोप्या घातल्या होत्या.
- मोर्चात फलकांचे अनेक चित्ररथ सहभागी करण्यात आले होते.
- अनेक मोर्चेकऱ्यांच्या हातात निषेधाचे काळे झेंडे होते.
- महिला वर्गाचा सहभागही मोर्चात लक्षणीय होता.
- मोर्चात ढोलताशे वाजवीत कार्यकर्ते सहभागी.
- महायुती सरकारचे श्राद्ध घालणारा चित्ररथ ठरला लक्षवेधी.
- मोर्चेकऱ्यांच्या गळ्यात मनसे आणि शिवसेनेच्या मफलर.
- बाळासाहेब, उद्धव, राज, आदित्य यांच्या फोटोचे कटआउट लक्षवेधी

संयुक्त जनआक्रोश मोर्चाला शिवसेनेचे नेते संजय राऊत उपस्थित होते. मनसेचे नेते बाळा नांदगावकर, अविनाश अभ्यंकर, संदीप देशपांडे हजर होते. सेनेचे उपनेते दत्ता गायकवाड, माजी आमदार वसंत गिते, माजी महापौर विनायक पांडे, ज्येष्ठ पदाधिकारी जयंत दिंडे, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, महानगरप्रमुख प्रथमेश गिते, उपजिल्हाप्रमुख अस्लम मणियार, मसूद जिलानी तसेच मनसेचे नेते दिनकर पाटील, रतनकुमार इचम, सलिम शेख, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, सुजाता डेरे, अरुणा पाटील, स्वागता उपासनी, धरम गोविंद यांच्यासह शहर आणि जिल्ह्यातील दोन्ही पक्षांचे नेते-पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते. शहरातील नागरी समस्या, हनीट्रॅप प्रकरण, रस्त्यांवरील खड्डे आणि मोठ्या प्रमाणात वाढलेली या मुद्द्यांवर दोन्ही पक्षांनी थेट रस्त्यावर उतरत मोर्चाच्या रूपाने रां पेटविल्याने अवघ्या नाशिकरांचे लक्ष या मोर्चाकडे वेधले गेले होते. शहरात सर्वत्र हेच मुद्दे, विषय चर्चिले जात होते. सत्ताधारी महायुतीच्या विरोधात मनसे आणि शिवसेनेचे मोर्चा काढल्याने पोलिसांनी विशेष दक्षता घेत बंदोबस्त आवळला होता. मोर्चा मोठ्या प्रमाणात असल्याने शालिमार, गंजमाळ सिग्नल, धुमाळ पॉईंट, मेनरोड परिसर, मेहेर परिसरातील वाहतूक विस्कळीत होऊन काही काळ वाहतूक कोंडीही झाली होती. मोर्चात सहभागी कार्यकर्त्यांनी गळ्यात मनसे-शिवसेनेचे पट्टे, मफलर घातल्या होत्या. जवळपास सर्वच मोर्चेकरांनी डोक्यावर जनआक्रोश मोर्चा... नाशिक ब्लॅकआऊट... अंधाराकडून उजेडाकडे... अशा आशयाचा मजकूर लिहिलेल्या गांधी टोप्या घातल्या होत्या.

# जिल्हा मार्ग रस्त्यांची राज्य मार्गात दर्जोन्नती

### ८३.२०० किमी लांबीच्या प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ८०, ७९,१७६ ला 'राज्यमार्ग ५०७ क्रमांक'

**नाशिक ।** राज्याचे नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांतून येवला तालुक्यातील ८३.२०० किमी लांबीच्या प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ८०, ७९ व १७६ ची दर्जोन्नती होऊन या रस्त्यांना 'राज्यमार्ग ५०७ क्रमांक प्राप्त झाला आहे.

या निर्णयामुळे या रस्त्यांच्या विकासासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देखभाल दुरुस्ती तसेच विकासासाठी अधिक निधी प्राप्त होऊन रस्त्यांचा विकास होणार आहे. त्यामुळे नागरिकांचे दळणवळण अधिक सुलभ होणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ जी पासून नांदेसर -आडगाव - चौथवा - उंदरी वाडी -देवळाणे-खाम गाव - भुलेगाव - वाघाळ -भारम - खरवंडी -ममदापुर - राजापूर ते मनमाड राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ जी ला मिळणारा रस्ता या प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ८०, ७९ व १७६ ची दर्जोन्नती होऊन या रस्त्यांना 'राज्यमार्ग ५०७ क्रमांक प्राप्त झाला आहे. या रस्त्यांना आता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देखभाल दुरुस्ती, रुंदीकरण आणि देखभालीसाठी आवश्यक प्राधान्य दिले जाणार आहे. या निर्णयामुळे शेतकरी, व्यावसायिक, व्यापारी, विद्यार्थ्यांना दळणवळणाच्या दर्जेदार सुविधा उपलब्ध होणार आहेत. कृषी मालाची वाहतूक करण्यासाठी अधिक सुलभता येणार आहे.

# मखमलाबाद ते राऊ हॉटेल चौक परिसरात अतिक्रमण हटविले

## नाशिक मनपा पंचवटी अतिक्रमण विभाग ॲक्शन मोडवर






**आडगाव ।** नाशिक मनपाच्या पंचवटी अतिक्रमण विभागाची धडक कारवाई. करण्याचा सपाटा सुरु केला असून, नाशिक शहरातील तसेच पंचवटी परिसरात असलेल्या मखमलाबाद ते राऊ हॉटेल चौक परिसरात ही धडाकेबाज कारवाई करण्यात आली.

यावेळी रस्त्यावर असलेल्या अतिक्रमण यावेळी जमीनदोस्त करण्यात आले असून. काही हातगाडे. चिकन स्टॉल. उचलून नेण्यात आले. नाशिक मनपाच्या अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे व उपायुक्त सुवर्णा दखने यांच्या आदेशानुसार विभागीय अधिकारी मदन हरिश्चंद्र यांच्या मार्गदर्शन खाली ही मोहीम राबविण्यात आली. याच परिसरात रस्त्यात हातगाडी. भाजीपाला विक्रेते फ्रुटस विक्रेते. बसत असतात त्यामुळे रस्त्यावर वाहणाच्या रांगा लागत असतात. त्यामुळे मनपाच्या अतिक्रमण विभागामुळे तीव्र स्वरूपाची मोहीम हाती घेण्यात आली. अतिक्रमण जेसीबीच्या साह्याने जमीनदोस्त करण्यात आले. यावेळी अतिक्रमण निरीक्षक प्रवीण मोरे, अतिक्रमण अधिकारी, मिलिंद जाधव, राष्ट्रीय फेरीवाला झोन अधिकारी राजेश सोनवणे, उमेश खैरे, निलेश काळे, राजू सोळंखे, दत्ता आहेर, जिभाऊ गरुड व टीमने अतिक्रमण मोहीम राबविली.

# वणी शहरात अवैध धंदे चालकांचा उच्छाद; पोलिसांची उदासीनता की राजकीय वरदहस्त

**नाशिक ।** स्थानिक पोलिसांची अपुर्ण बळ, गुन्ह्याची वाढती व्याप्ती आणि अवैध व्यवसायांवरील उदासीनतेमुळे वणी शहरात अवैध धंद्यांनी इतका उच्छाद मांडला आहे की गुटखा, दारू, मटका, जुगार आणि अमली पदार्थांचा सर्रास धंदा उघडपणे सुरू आणि परिसरात कायदा व सुव्यवस्था धोक्यात आलेली दिसत आहे. बेकायदेशीर दारु, गुटखा विक्री, मटका, अंमली पदार्थ व जुगाराच्या अड्ड्यांचा सुळसुळाट हा सध्या स्थानिक जनता आणि ग्रामपंचायतींसाठी गंभीर विषय बनला आहे. त्यामुळे या अवैध धंद्यांवर वरिष्ठ पातळीवरून कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.








तत्कालीन पोलिस अधिक्षक शहाजी उमाप यांच्या कार्यकाळात अवैध व्यवसायांवर कारवाई कठोरपणे करण्यात आली होती. तेव्हापासून पोलिसांनी रहिवाशांना माहीती देण्यासाठी भ्रमणध्वनी क्रमांकही उपलब्ध करून दिला होता आणि माहीती देणाऱ्यांची गुप्तता राखण्याची हमी दिल्याने ग्रामीण भागातून माहिति मिळाल्या नंतर धडक कारवाया झाल्या होत्या.परंतु शहाजी उमाप यांच्या बदलीनंतर हा अवैध व्यवसायावरील पोलिसांचा अंकुश ढळल्याचे नागरिकांच्या तक्रारीतून समोर आले आहे. जिल्ह्यातील अनेक ठिकाणच्या तक्रारींनुसार अवैध धंद्यांचा बोलबाला वाढला असून, जरी कधीकधी कारवाया होत असल्या तरी त्या अपुर्ण स्वरूपाच्या असल्याने अवैध धंदे चालकांचे धाडस वाढल्याचे दिसून येत आहे. पोलिसांकडून अवैध व्यवसायांच्या अड्ड्यांवर थेट मालकांवर कारवाई न करता तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई केली जात असून अवैध व्यवसाय करणारा मालक नामानिराळा राहतो. त्यामुळे राजरोसपणे अवैध व्यवसाय सुरू सुरु ठेवले जात आहे.

स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस ठाणे अधिकारी आणि विशेष पोलिस पथके यांना सक्षमपणे काम करण्याची गरज असली तरीही स्थानिक पातळीवरील सेटिंग, राजकीय संरक्षण यांसारख्या बाबींमुळे हा प्रश्न अधिक बिकट झाल्याचे दिसून येत आहे. सध्या यंत्रणेमधील पोलीस स्टेशन अंतर्गत पोस्टिंग, क्रीम पोस्टिंग व इतर अंतर्गत यंत्रणाच्या सेटिंगबाबत चर्चाही सुरू आहेत.ज्यामुळे संबंधित यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर शंका उपस्थित केली जात आहे. ग्रामीण भागातील ग्रामपंचायती आणि नागरिकांनी मोर्चे काढले, निषेध नोंदवले आणि पत्रव्यवहार केला तरी त्या तक्रारींवर योग्य प्रतिसाद मिळत नाही. हे देखील नागरिकांसाठी चिंतेचे कारण आहे. शहरी भागात पोलिस आयुक्तांकडून ऑपरेशन्स करून मोठ्या प्रमाणावर कारवाया करण्यात आल्या आहेत; अशीच कार्यपद्धती ग्रामीण भागातही राबविणे अत्यावश्यक आहे, असे नागरिकांचे मत आहे. विशेषत: पोलीस उपअधीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, अप्पर पोलिस अधिक्षक यांसारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अवैध व्यवसायांना उखडून टाकण्यासाठी नेमक्या कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत याविषयी जनजागृती करणे गरजेचे असल्याची प्रतिक्रीया काही ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. अवैध व्यवसायांवर नागरिकांच्या समन्वयाने, गुप्त माहितीचा वापर करून, मालकांपर्यंत थेट पोहचणारी कारवाई करणे आवश्यक आहे. थातुरमातुर कारवाया अवैध व्यवसायांना खतपाणी घालणाऱ्या आहेत असा मतप्रवाह बनत चालला आहे.

# डंपरच्या धडकेत मुलाचा मृत्यू

**भाईंदर, दि. १२ : प्रतिनिधी**

काशीमीरा येथील निलकमल नाक्याजवळ गुरूवारी दुपारी सिमेंट काँक्रिटची वाहतूक करणाऱ्या डंपरने एका १२ वर्षीय सनी राठोड या मुलाला धडक लागली होती. त्यानंतर रुग्णालयात मुलावर उपचार सुरू असताना सायंकाळी मृत्यु झाल्याची घटना घडली आहे.

काशीमीरा परिसरातील माशाचा पाडा या भागात मोठ्या प्रमाणात सिमेंट काँक्रिट प्लांट सुरू आहेत. या प्लांटमधून काँक्रिट घेवून जाणारे डंपर भरधाव जात असतात. त्यामुळे यापूर्वी देखील अनेक अपघात घडले आहेत. अनेकवेळा या सिमेंट काँक्रिटच्या गाड्यांमधून रस्त्यांवर सिमेंट पडते. त्यामुळे दुचाकी चालक घसरुन अपघात होतात. याबाबत महापालिका व वाहतूक विभागाकडे तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जाते. वाहतूक पोलिसांसमोर भरधाव डंपर जात असताना त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

गेल्या दोन दिवसांपूर्वी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मिरा भाईंदर शहरातील सर्व आरएमसी प्लांट तात्काळ बंद करण्याची मागणी केली होती. त्यानंतरही महापालिका व पोलीस प्रशासनाकडून त्याची प्रभावी अंमलबजावणी केलेली नाही. याच दुर्लक्षामुळे आज ही दुर्दैवी घटना घडल्याचा आरोप केला जात आहे.

काशीमीरा परीसरात सिमेंट काँक्रिटच्या गाड्यामुळे अनेक अपघात घडत आहेत. गुरूवारी दुपारी नीलकमल नाका येथे सनी राठोड हा १२ वर्षाचा मुलगा शाळेतून घरी जात असताना डंपरने धडक दिली. या मुलाला खासगी रुग्णालयात दाखल केले असता त्याच्यावर उपचार सुरू असताना सायंकाळी मृत्यू झाला आहे. मुलाचा मृत्यू झाल्याची माहिती नातेवाईकांना मिळाली. त्यावेळी नातेवाईकांनी रुग्णालया बाहेर ठिय्या मांडून बसले होते. पोलिस घटनास्थळी दाखल होत नातेवाईकांना समजावत त्यांना शांत केले. अपघात घडल्यानंतर मनसे कार्यकर्ते व मोठया संख्येने नागरिक जमा झाले होते. त्यानंतर नागरिकांनी संताप व्यक्त करत रास्ता रोको आंदोलन केले.

काही वेळाने पोलीस घटनास्थळी दाखल झाल्यानंतर वाहतूक खुली करून डंपर चालकाला ताब्यात घेत काशीगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शुक्रवारी सकाळी ११ च्या सुमारास ग्रीन व्हिलेज परिसरात रस्त्यावर बसत लोकांनी आरएमसी प्लांट बंद करण्याची मागणी केली होती. मोठ्या प्रमाणात घोषणा बाजी करण्यात येत होती.त्यांनंतर देखील आंदोलनाच्या वेळी आरएमसी ट्रक येत जात असताना दिसून आल्याने आंदोलन करणाऱ्याकडून रोष व्यक्त केला गेला.

घटनास्थळी मोठ्या प्रमाणात पोलीस उपस्थित होते. त्यानंतर मिरा भाईंदर महापालिका अतिक्रमण प्रमुख नरेंद्र चव्हाण यांनी आंदोलन करत्याशी संपर्क साधत काशिमीरा परिसरात असणाऱ्या पाच आरएमसी प्लांट आज सील करण्यात येतील असे आश्वासन दिले.प्लांट सील करण्यात आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

# सिडको विस्थापित गावांना मिळाली जुनी ओळख; गावांची नावे पूर्ववत

**पनवेल, दि. १२ : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या गावांना आता त्यांची जुनी ओळख परत मिळाली आहे. सिडकोने या गावांना आर-१, आर-२, आर-३, अशी नवीन नावे दिली होती, ज्यामुळे त्यांची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळख पुसली जात होती. यामुळे, गावातील रहिवाशांनी आपली जुनी ओळख कायम ठेवण्यासाठी दहा गाव समिती आणि ग्रामस्थांच्या माध्यमातून पाठपुरावा केला आणि या प्रयत्नांना आमदार महेश बालदी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठबळ दिले आणि अखेरीस सिडकोने गावांना त्यांची जुनी नावे परत देण्याचा निर्णय घेतला आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे चिंचपाडा, कोल्ही, कोपर, वाघीवली वाडा, वरचे ओवळे, कोंबडभूजे, तरघर, गणेशपुरी आणि उलवे ही गावे विस्थापित झाली, पण त्यांच्या खरी ओळख जपण्याऐवजी सिडकोने त्यांना आर-१, आर-२, आर-३, आर-४, आर-५ अशी नवीन नावे दिली आणि गावांचा इतिहास व संस्कृती पुसून टाकली. या गावांना त्यांची जुनी ओळख कायम राहावी यासाठी दहा गाव समिती आणि ग्रामस्थांनी पाठपुरावा केला होता. त्याला आमदार महेश बालदी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठबळ देऊन सिडकोने आता या गावांना जुनी ओळख कायम केली आहे. त्यानुसार आता जुन्या नावाची ओळख गावांना परत मिळाली असून सेक्टर आर-१ हे 'चिंचपाडा सेक्टर आर १', सेक्टर आर-२ हे 'चिंचपाडा सेक्टर आर २', सेक्टर आर-३ हे 'चिंचपाडा व कोल्ही सेक्टर आर ३', सेक्टर आर-४ हे 'कोपर सेक्टर आर ४', सेक्टर आर-५ हे 'वाघिवलीवाडा सेक्टर आर ५', सेक्टर १ हे 'वरचे ओवळे सेक्टर १', सेक्टर २४ हे 'उलवे सेक्टर २४', सेक्टर २५ हे 'तरघर व कोंबडभुजे सेक्टर २५', सेक्टर २५ ए हे 'कोंबडभुजे व गणेशपुरी सेक्टर २५', सेक्टर २६ हे वाघिवली सेक्टर २६, तर सेक्टर १३ हे 'डुंगी सेक्टर ३' या नावाने अर्थात जुन्या नावाने ओळखले जाणार आहे. सिडकोने पनवेल परिसरात होणाऱ्या विमानतळाच्या बांधणीसाठी चिंचपाडा, कोल्ही कोपर, पारगाव, ओवळे, कोंबडभुजे, उलवेसारख्या भागातील जमिनी संपादित केल्या जमिनी संपादित करताना त्यांना मोबदला म्हणून २२.५ टक्के प्रमाणे भूखंड देण्यात आले. नवी मुंबई विमानतळ उभारताना जी गावे विस्थापित आली आहेत त्यांना सिडकोने भूखंड देऊन तेथे इमारती उभ्या राहिल्या. गावाचे गावपण जाते की काय असा प्रश्न तेव्हा अनेकांना पडू लागला. भूखंडावर इमारती उभ्या राहिल्या. भूखंड सिडकोचे असल्याने त्यांना नावेही सिडकोने दिली. मात्र गावांची ओळख कायम रहावी यासाठी सिडकोकडे मागणी करण्यात आली आणि त्या मागणीला आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाठबळ दिले. या संदर्भात सिडकोने महत्वपूर्ण निर्णय घेत गावांना आता त्यांची जुनी ओळख कायम ठेवली आहे.

विमानतळबाधित गावांना ओळख मिळून देण्यासाठी दहा गाव समिती आणि आम्ही पाठपुरावा केला होता. त्याला आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी पाठबळ दिले. त्यामुळे आता आम्हाला आमची जुनी ओळख मिळणार आहे. यामुळे आमच्या भागातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला असून त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.

**- समीर मदन केणी, पंचायत समिती अध्यक्ष, वडघर विभाग भाजप**

आज आमच्या गावाचं पुनर्वसन होऊनसुद्धा त्याला मूळ नावानेच ओळख मिळाली, हे आमच्यासाठी अभिमानाचं आणि आनंदाचा क्षण आहे. गावाचं नाव जसंच्या तसं जपलं गेलं म्हणजेच आमच्या परंपरेला, इतिहासाला आणि आत्मसन्मानाला सलाम करण्यात आला आहे. ही महत्त्वाची बाब शक्य झाली ती आमदार महेश बालदी व आमदार प्रशांत ठाकूर साहेबांच्या प्रयत्नांमुळे. गावकऱ्यांच्या भावना ओळखून, प्रशासनाशी सातत्याने पाठपुरावा करून, प्रत्येक कुटुंबाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी त्यांनी घेतलेली मेहनत कौतुकास्पद आहे. आज पुनर्वसित गावातील प्रत्येक नागरिकांच्या मनात समाधान आहे की, "घर नवं झालं, जागा नवी झाली, पण गावाचं नाव तेच राहिलं." आमदार साहेबांनी दाखवलेला हा संवेदनशील दृष्टिकोन खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधीपणाचे उत्तम उदाहरण आहे. गावकऱ्यांच्या वतीने आम्ही आमदार साहेबांचे मनःपूर्वक आभार मानतो.

**- रुपेश धुमाळ, भाजप- अध्यक्ष पनवेल तालुका पश्चिम मंडळ**

# जव्हारच्या प्रसिद्ध शाही उरुसाला सुरुवात

**जव्हार, दि. १२ : प्रतिनिधी**



जव्हार संस्थानाला सहाशे वर्षाची वंशपरंपरा लाभलेली आहे. येथील प्राचीन इतिहास हा अतिशय प्रेरणादायी आहे. या संस्थानात आदिवासी राजांनी वंशपरंपरागत राज्य केले असून या संस्थानातील अतिशय प्राचीन व सर्वधर्म समावेशक सामाजिक एकात्मतेचा उरूस अतिशय आनंदाने व श्रध्देने साजरा केला जात असतो. यंदा जव्हार शहरात ५७३ वर्षाची परंपरा असलेल्या शाही उरुसाला १२ सप्टेंबरला सुरवात झाली आहे.

१३ आणि १४ पर्यंत इस्लामिक पद्धतीने संदल,चादर,मिरवणूक,लंगर (भंडारा) नंतर कव्वालीचा बहारदार व भरगच्च कार्यक्रमांद्वारे जल्लोषात साजरा होणार आहे. त्यासाठी स्थानिक मुस्लिम जमातिची उरूस कमिटी,नगर परिषद व पोलीस प्रशासनाने जय्यत तयारी केली असल्याचे मुस्लिम जमात उरूस समितीकडून सांगण्यात आले.

जव्हार शहराला पालघर जिल्ह्याचे महाबळेश्वर तर राज्यातील मिनी महाबळेश्वर म्हणून ओळखले जाते. लाभलेली नैसर्गिक संपदा म्हणून या शहराचा उल्लेख आहे. परंतु प्रति महाबळेश्वराच्या उल्लेखापेक्षा संस्थानाची गौरवशाली पार्श्वभूमी लाभलेली नगरी हा उल्लेख तमाम जव्हारकर नागरिकांच्या दृष्टीने अभिमानाचा विषय आहे. या शहराला राजाश्रय लाभल्याने अनेक चांगल्या परंपरा,चाली रुढी येथे अनेक काळापासून आजही चालू आहेत.

यात विशेष उल्लेख करायचा झाल्यास जव्हारचा सुप्रसिद्ध उरुस हा होय.हिंदू मुस्लिम तसेच सर्व धर्मीय बांधव एकोप्याने हा उरुस वंशपरंपरागत साजरा करीत आले आहेत.राष्ट्रीय एकात्मतेचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणूनही त्याची नोंद आहे . हजरत औलिया शाह सदरोद्दीन बदरोद्दीन हुसैनी चिस्ती(बाबा) यांचा हा उरुस ज्याची मुळ मजार ही नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील मौजे पिंपरी सद्रोद्दीन येथे स्थित आहे. मराठी भाद्रपद मध्ये येणाऱ्या कोणत्याही उर्दु महिन्याच्या २० तारखे नुसार व जव्हार येथे परंपरागत एक दिवस अगोदर हा उरूस दोन्ही ठिकाणी संयुक्तरित्या मोठ्या आनंदात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा केला जातो.त्यामुळे वंशपरंपरांगत पद्धतीने हे पुढे आजही सुरु आहे.

नाशिक, धुळे, मुंबई, पालघर, तारापूर, डहाणू, वसई, ठाणे आदी ठिकाणाहून भाविक येतात, तर जव्हारमधील मान्यवर, मुस्लिम बांधव व सर्वधर्मीय बांधव सहपरिवारने एकोप्याने या उत्सवात उपस्थित राहतात.

# बोईसर-पाचमार्ग येथील मुख्य रस्त्याची चाळण

**बोईसर, दि. १२ : प्रतिनिधी**

संबंधित ठेकेदारांमार्फत खड्डे बुजवण्याचे काम स्व खर्चातून केले जात आहे. सध्या सततच्या पावसामुळे या कामात काही प्रमाणात विलंब झाला आहे. तरीही, येत्या दोन दिवसांत मानक पद्धतीनुसार खड्डे बुजवण्याचे काम पूर्ण करू. जर ठेकेदारांकडून अपेक्षित प्रगती दिसून आली नाही, तर आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून रस्त्याच्या दुरुस्तीची कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी पर्यायी उपाययोजना करू. नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू

**- पी. चव्हाण, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग**

बोईसर-पाचमार्ग येथील मुख्य रस्त्याची अवस्था अक्षरशः चाळण झाली असून, खड्डे आणि उखडलेल्या डांबरामुळे हा रस्ता प्रवाशांसाठी धोकादायक बनला आहे. या रस्त्यावरून



चिंचणी, दहिसर, वेंगणी दांडी, आणि अणुशक्ती केंद्र प्रकल्पाकडे जाणारी वर्दळ सतत सुरू असते. मात्र, रस्त्याच्या दुरवस्थेमुळे प्रवास अत्यंत त्रासदायक आणि जोखमीचा झाला आहे.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत व्यस्त असणाऱ्या या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दुचाकीस्वारांना पडण्याचा धोका आहे. तर अवजड वाहनांमुळे उडणारी धूळ स्थानिक दुकानदार आणि प्रवाशांना त्रस्त करत आहे. आजूबाजूच्या खाद्यपदार्थ, मिठाई आणि हॉटेलच्या दुकानांवर धुळीचा मोठा परिणाम होत आहे. "रात्रीच्या वेळी खड्डे दिसत नाहीत, जीव मुठीत घेऊन गाडी चालवावी लागते," अशी तक्रार स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केली.

हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येतो. मात्र, विभागाकडून याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. "रस्त्याची दुरुस्ती झाली तर प्रवास सुखकर होईल आणि अपघातांचा धोका कमी होईल," असे स्थानिक दुकानदार रमेश यांनी सांगितले. स्थानिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे खड्डे बुजवून रस्त्याचे डांबरीकरण तातडीने करण्याची मागणी केली आहे. "जर लवकर दुरुस्ती झाली नाही, तर अपघात आणि आरोग्याच्या समस्यांमध्ये वाढ होईल," अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी याबाबत काय पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तोपर्यंत पाचमार्गच्या नागरिकांना या खड्ड्यांच्या रस्त्यातून प्रवास करताना कसरत करावी लागणार आहे.

## 358 भरती पदांचा वाद मुंबई हायकोर्टात

**भाईंदर, दि. १२ : प्रतिनिधी**

मीरा-भाईंदर महानगरपालिकेतर्फे घेतली जात असलेली ३५८ पदांची भरती प्रक्रिया सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. या भरती प्रक्रियेत येणाऱ्या ९ पदांवर आक्षेप घेत "झुंज जनरल कामगार युनियन"ने मुंबई हायकोर्टात धाव घेतली आहे. या याचिकेमध्ये विशेषतः बालवाडी शिक्षिका आणि अधिपरिचारिका (महिला कर्मचारी) यांच्या हक्कांचा मुद्दा उपस्थित केला गेला आहे. युनियनचे दोन सदस्य बालवाडी शिक्षिका आणि पाच सदस्य अधिपरिचारिका आहेत, ज्यांच्या कायम नियुक्तीच्या हक्कांना धोका निर्माण झाला आहे. कामगारांचे हक्क सुरक्षित राहावेत, हाच या पावलामागचा मुख्य उद्देश आहे, अशी माहिती युनियनचे अध्यक्ष डॉ. अमित भोसले यांनी दिली.

# कोसळलेल्या स्लॅबचे महापालिका ऑडिट करणार

**वसई, दि. १२ : प्रतिनिधी**

वसई पश्चिम येथील कृष्णा टाऊनशिप येथे दोन दिवसांपूर्वी नाल्यावर असलेला स्लॅब कोसळल्याची घटना घडली होती. त्याठिकाणी लहान मुलांसाठी खेळणी बसवण्यात आली आहेत. या संदर्भात बहुजन विकास आघाडीचे एच प्रभाग समितीचे माजी सभापती वृन्देश पाटील यांनी त्वरित वसई विरार महापालिकेकडे पाठपुरावा केला व ऑडिट करण्याची मागणी केली असून या पाठपुराव्याला यश आले आहे. महापालिकेने जागेची पाहणी करून ऑडिट करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

कृष्णा टाऊनशिप परिसरात राहणाऱ्या मुलांसाठी मागील २० ते २५ वर्षांपूर्वी खेळणी बसवण्यात आली आहेत. त्यामुळे येथील लहान मुलांना लाभ मिळाला आहे. मात्र, येथे टाकलेला स्लॅब अचानक कोसळला व खोलगट भाग निर्माण झाला. त्यामुळे माजी सभापती पाटील यांनी नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने महापालिकेशी संपर्क केला व उपायोजना कराव्यात तसेच या जागेचे ऑडिट करावे अशी मागणी केली. त्यानंतर महापालिकेने पाहणी केली असून , लवकरच स्टक्चर ऑडिट करून , पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे.

# अदाणी जेम्स स्कूल ऑफ एक्सलन्सला भारतातील सर्वोत्तम उदयोन्मुख शाळांमध्ये मान्यता मिळाली

**नागपूर, १२ सप्टेंबर :** लखनौ येथील अदाणी जेम्स स्कूल ऑफ एक्सलन्सला भारतातील (इंडियन करिक्युलम) तिसऱ्या क्रमांकाची सर्वोत्तम उदयोन्मुख शाळा आणि लखनौमधील नंबर १ उदयोन्मुख शाळा म्हणून मान्यता मिळाली आहे. शाळेच्या पहिल्याच वर्षात मिळालेला हा सन्मान त्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाबद्दलच्या वाढत्या प्रतिष्ठेला अधोरेखित करतो.

ही मान्यता सीफोर या बहुआयामी संशोधन संस्थेने केली. त्यांनी संपूर्ण देशभर सर्वेक्षण करून सर्वोत्तम उदयोन्मुख खासगी शाळांची यादी जाहीर केली. या सर्वेक्षणात पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षणतज्ज्ञ आणि विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. त्यांनी शाळांचे मूल्यमापन १० गुणांच्या श्रेणीवर १४ वेगवेगळ्या निकषांवर केले, ज्यामध्ये अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, पायाभूत सुविधा, नवनवीन उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा समावेश होता.

या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन १० सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथे होणार आहे, जिथे देशातील नामांकित शिक्षणतज्ज्ञ आणि संस्थांचा सन्मान केला जाईल.

आपल्या स्थापनेपासूनच अदाणी जेम्स स्कूल ऑफ एक्सलन्सने नवीन शैक्षणिक पद्धती, जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करून वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या यशाबद्दल बोलताना डॉ. प्रीती अदाणी, चेअरपर्सन, अदाणी जेम्स एज्युकेशन म्हणाल्या:

ही मान्यता आम्हाला पुन्हा एकदा खात्री देते की शिक्षण हे फक्त अभ्यासापुरते मर्यादित न राहता सामाजिकदृष्ट्या जबाबदार, आत्मविश्वासू आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व घडविणारे असले पाहिजे. लखनौमधील सर्वोत्तम उदयोन्मुख शाळा आणि भारतातील सर्वोत्तम शाळांपैकी एक म्हणून निवड होणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे आणि पुढे प्रगत शिक्षणाच्या दिशेने नवे आदर्श निर्माण करण्याची जबाबदारी देखील आहे.

हा पुरस्कार शाळेची परिवर्तन घडवणारी संस्था म्हणूनची भूमिका अधोरेखित करतो, जी विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, चिकित्सक विचार करण्याची क्षमता आणि जागतिक स्तरावरील जबाबदार नागरिक म्हणून प्रगती करण्यासाठी आवश्यक मूल्ये रुजवण्यास कटिबद्ध आहे. या मान्यतेमुळे, अदानी जेम्स स्कूल ऑफ एक्सलन्सने तरुण पिढीला प्रेरणा देणे, समाजाशी नाते अधिक मजबूत करणे आणि उज्ज्वल भविष्य निर्माण करणे हे आपले ध्येय अधिक बळकट केले आहे.

## राशीभविष्य

**मेष :** कामाच्या ठिकाणी मेहनत केल्यास परिस्थिती सुधारेल. खाजगी व्यवसाय करणाजयांना अचानक नफा मिळण्याची शक्यता आहे. सुरक्षा क्षेत्रात काम करणाजया लोकांना शौर्याच्या जोरावर लक्षणीय यश मिळेल.

**वृषभ :** आज, अतिरिक्त परिश्रम तुमच्या व्यवसायात आणि उपजीविकेत सुधारणा करतील. लपलेल्या शत्रूंपासून सावध रहा. ते तुमच्या कमकुवतपणाचा फायदा घेऊ शकतात. प्रकृतीला जपा.

**मिथुन :** आज कुटुंबात काही कारणास्तव तणाव निर्माण होऊ शकतो. तुम्ही तुमचा राग आणि कठोर शब्दांवर नियंत्रण ठेवावे. अन्यथा, हे प्रकरण गंभीर भांडणाचे रूप धारण करू शकते.

**कर्क :** आज तुम्हाला मिश्रित परिणाम मिळतील. तुमचे वर्तन सुधारण्याचा प्रयत्न करा. समाजात तुमची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करा. तुमचे महत्त्वाचे काम इतरांवर सोपवू नका.

**सिंह :** आज तुम्ही क्रीडा स्पर्धेत यशस्वी व्हाल. न्यायालयीन प्रकरणांमध्ये यशस्वी व्हाल. शेतीच्या कामात लोकांना सरकारी मदत मिळेल. नोकरीत तुम्हाला काही महत्त्वाची जबाबदारी मिळू शकेल.

**कन्या :** तुम्हाला रोजगाराच्या संधी मिळतील. राजकारणातील उच्चपदस्थ व्यक्तीशी तुमची जवळीक वाढेल. ज्यामुळे राजकीय क्षेत्रात तुमचा प्रभाव वाढेल. कुटुंबात आनंदाचा संचार होईल.

**तुळ :** बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना त्यांच्या बॉसच्या जवळचा फायदा होईल.शिक्षण, आर्थिक आणि कृषी क्षेत्रात काम करणाजया लोकांना फायदेशीर संधी मिळतील.

**वृश्चिक :** व्यवसायात कठोर परिश्रम केल्यास नंतर यश मिळेल. एखादे अपूर्ण काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे. तुम्हाला कामगार म्हणून नोकरी मिळेल.


**धनु :** बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना त्यांच्या कार्यक्षम कामामुळे पदोन्नती मिळेल. सरकारी मदतीने नोकरीशी संबंधित समस्या सोडवल्या जातील. बौद्धिक आणि शारीरिक कामांमध्ये यश मिळेल.

**मकर :** व्यवसायात तुमचा आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. तुमच्या विरोधकांपासून सावध रहा. ते तुमच्या भावनिकतेचा फायदा घेऊ शकतात. कामाच्या ठिकाणी तुमच्या वरिष्ठांशी अनावश्यक संघर्ष होऊ शकतो.

**कुंभ :** कामाच्या ठिकाणी संयमाने काम करा. तुम्हाला काही महत्त्वाच्या कामात यश मिळेल. व्यवसायात नवीन करार होतील. कोणतेही अपूर्ण काम पूर्ण केल्याने तुमचे धैर्य आणि मनोबल वाढेल.

**मीन :** अनेक वर्षापासूनची मनातील इच्छा पूर्ण झाल्याने अचानक आनंदाश्रू येतील. मनावरचा ताण कमी झाल्यासारखं वाटेल. कुटुंबामध्ये आज अत्याधिक आनंदाचे वातावरण असेल.

## शब्दकोडे क्रमांक २२१६




**आडवे शब्द :-**
१) मुंज, मौंजीबंधन
५) अतिशय खोल तळाचा ठाव लागत नसलेला
८) पोलिस चौकी
९) उद्याच्या नंतरचा दिवस
१०) योग्य, उचित
११) अस्थिर होणे, हलणे
१४) जाणे
१५) स्वत:बद्दलची कमीपणाची भावना
१६) लाकूड तासण्याचे हत्यार
१७) चांदी
१९) वाद्य वाजविण्याची कला
२०) विश्व
२१) नारळ सुपारीच्या पात्यामधील उभा दांडा नाश पावणारे
२२) पदार्थाचा सूक्ष्म भाग, अणु
२४) उद्दिष्ट, नियम
२७) मध
२९) भेग वाढविणारी खुंटी
३०) *** गाडगे
३२) जगाचे कालचक्र
३३) वाहणारी हवा
३५) जपजाप्य
३७) अंत:करण
३८) बारीकसारीक
४१) मालक
४२) पुरुष
४४) नाचणी
४५) शंभर
४८) कथिल व तांबे यांचा मिश्र धातू
५०) सरसकट
५२) हवेतील गारवा
५५) जंगलातील प्राणी
५७) बासरी
५८) केस कापणे
६०) रंग (इं.)
६२) पोलिस
६३) मीठ
६४) थोडक्यात सामोपचार
६६) मान खाली घातलेला
६७) रुपेरी मुलामा

**उभे शब्द :-**
१) मेहेरबानी
२) पंख
३) नव प्रवेशित
४) नजरेचा तीर
५) निरर्थक
६) विपुल, पुरुन उरेल इतके
७) यज्ञ
८) ठाण्याचा रहिवासी
१२) केळवण
१३) साक्ष (हिं.)
१८) माय बाप
२२) कदर करणारा
२३) अनुमती
२५) गावातील विद्वान, सावकार
२६) गुरांचा घोळका
२८) वर्ण
२९) गावाचा कारभार पाहणारा -- एक पद
३१) गाडीचे छत
३४) ढीग
३६) त्रास, बडबड
३७) मधुमक्षिका
३९) मोठी टोपली
४०) सोने
४३) मातीचा कण
४५) मंदवासर
४६) कारस्थान
४७) देवापाशी मागीतलेला निर्णय
४९) पवित्र, शुद्ध
५०) पावसाची झड
५१) पत्र
५३) पायाचा खालचा भाग
५४) खिडकीची पातळ काच
५६) छोटी लढाई
५९) पुन्हा
६०) वाळवी, उणीव
६१) चिव चिव करणारा छोटा पक्षी
६२) सीमा
६३) योग्य, वाजवी
६४) प्रामाणिक

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## ➤ महत्त्वाचे

### मनमाडला शिवसेनेतर्फे आनंदोत्सव साजरा

**मनमाड ।** महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची भारताच्या उपराष्ट्रपतीपदी बहुमताने निवड झाल्याबद्दल मनमाड शहरात शिवसेनेच्यावतीने जल्लोष करण्यात आला.



आमदार सुहास कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीतील पदाधिकाऱ्यांनी फटाके फोडून आणि एकमेकांना पेढे वाटून आनंद साजरा केला. या उत्सवात शिवसेना शहरप्रमुख मयूर बोरसे, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र अहिरे, शिवसेना जिल्हा उपप्रमुख सुनील हांडगे, जिल्हा समन्वयक संजय कटारिया, आरपीआय जिल्हा सचिव गंगादादा त्रिभुवन, कैलास गवळी, सादिक तांबोळी, युवा सेना शहराधिकारी आसिफ शेख, राजेंद्र जाधव, तसेच महायुतीचे इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खैरायपालीत महिलांची शेतीशाळा

**हरसूल ।** त्र्यंबकेश्वर तालुक्यातील खैरायपाली येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पार्गत



महिला शेतीशाळा घेण्यात आली. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पार्गत खैरायपाली येथील महिला बचत गटाची महिला शेतीशाळा घेण्यात आली. या बचत गटाच्या महिलांना प्रत्यक्ष शेतीच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन करण्यात आले.यात भात पिकावरील करपा, पूर्ण करपा, तुडतुडे, अळी, कीटकनाशक रोग व त्यावरील उपाय योजना माहिती देण्यात आली.यावेळी इंद्रायणी, दप्तरी, वायएसआर, स्वराज्य, मातोश्री, संकल्प, माऊली, राधाकृष्णा, सप्तश्रृंगी सरस्वती महिला बचत गटांनी सहभाग घेतला.

# 'महासागर'च्या दणक्याने रेशन धान्याची काळाबाजारी थांबली



इम्पॅक्ट

### पुरवठा विभागावर प्रश्नचिन्ह कायम

**नाशिक ।** निफाड तालुक्यातील विंचूर, लासलगाव परिसरात रेशनच्या धान्याचा मोठ्या प्रमाणात सुरू असलेला काळाबाजार दै. महासागरने उघडकीस आणल्यानंतर माफियांचे धाबे दणाणले आहेत. गोरगरिबांच्या हक्काचे धान्य बाजारपेठेत वळवून लाखोंची माया जमविणाऱ्या या माफियांनी अचानक आपली दुकाने आवरली असली तरी, या रॅकेटला राजकीय वरदहस्त आणि काही अधिकाऱ्यांचा छुपा पाठिंबा असल्याची जोरदार चर्चा आहे.

या काळाबाजाराच्या गोरखधंद्यात राहुल आणि निलेश या दोन भामट्यांचा थेट सहभाग असल्याचे उघड झाले आहे. स्थानिक रेशन दुकानदारांशी संधान साधून हे दोघे गोरगरिबांसाठी असलेले धान्य कमी भावात खरेदी करीत. त्यानंतर त्यावर रासायनिक प्रक्रिया करून ते खुले बाजारात विक्रीस काढले जात होते. धक्कादायक बाब म्हणजे या रसायनांचा मानवी आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होतो, असा तज्ज्ञांचे मत आहे. म्हणजेच पैशांच्या हव्यासापोटी हे माफिया लोकांच्या जीवाशी अक्षरशः खेळ करीत असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे राहुल आणि निलेश कोण आहे याबाबत सर्वांनाच उत्सुकता लागून आहे. या काळा बाजारात एका पोलीस कर्मचाऱ्याचा देखील सहभाग असल्याची जोरदार चर्चा आहे. जरी त्याची बदली झाल्याने अलीकडे तो थेट गुंतलेला दिसत नसला तरी, राहुल,निलेशला एका राजकीय पदाधिकाऱ्याचा भक्कम पाठींबा असल्याने हा धंदा उघडपणे फोफावला असल्याचे स्पष्ट होत आहे. या माफियांच्या पाठिशी उमराणा येथील देवरे नावाचा धान्य व कांदा व्यापारी उभा आहे. त्यामुळे गोरगरिबांच्या तोंडचा घास हिरावून तो खुल्या बाजारात विकला जात आहे. या गोरखधंद्याची माहिती निफाड पुरवठा विभागालाही असल्याचे स्पष्ट झाले आहे. इतकेच नव्हे तर, यातील एक कर्मचारी या माफियांशी संबंधित असल्याचे दै. महासागरने यापूर्वीच उघड केले आहे. इतका मोठा प्रकार उघडकीस आल्यानंतरही शासन, पोलीस वा प्रशासनाने ठोस कारवाई करण्याचे धाडस दाखवलेले नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या गंभीर प्रकरणात शासन यंत्रणा डोळेझाक करत असल्याने या माफियांना छुपा पाठिंबा मिळतोय का, असा सवाल उपस्थित होत आहे. रेशन धान्य काळाबाजारामुळे गरीबांना उपाशी माफियांनी आपले उखळ पांढरे केले आहे.

# प्राचार्य ग. वि. अकोलकर संस्थेचा शिक्षक पुरस्कार राजेंद्र सोमवंशी यांना जाहीर



**नाशिक ।** येथील प्राचार्य ग.वि.अकोलकर मानसिक क्षमता शोधन संस्थेचा श्रीमती मुग्धा जोशी उपक्रमशील मातृभाषा शिक्षक पुरस्कार यशोदामाता डायाभाई बिटको गर्ल्स हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज नाशिकचे उपमुख्याध्यापक राजेंद्र सोमवंशी यांना जाहीर झाला. सोमवंशी हे दि न्यू एज्युकेशन इन्स्टिट्यूट, नाशिक या संस्थेत ३१ वर्षापासून कार्यरत असून यापूर्वीही त्यांना विविध संस्थांनी जिल्हा व राज्य पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. बाल साहित्यिक म्हणून सुप्रसिद्ध असलेले कवी सोमवंशी यांचे दोन बालकविता संग्रह प्रसिद्ध असून "गम्माडी-गंमत" व "गीत नवे गाऊ" या बालकाव्यसंग्रहांना अनेक जिल्हा व राज्य पुरस्कार मिळालेले आहेत. दिल्ली येथे संपन्न झालेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात त्यांना निमंत्रित कवी म्हणून सन्मान मिळाला आहे. शालेय पाठ्यपुस्तकातील कवी लेखक व इतर मान्यवर कवी लेखकांची थेट फोनवरून संवाद साधत विद्यार्थिनींना "थेट भेट कवींशी" या उपक्रमाद्वारे विद्यार्थिनींची साहित्यिकांशी भेट घडवून आणली आहे. विद्यार्थिनींना अभिव्यक्त होण्यासाठी मुख्याध्यापिका सविता कुशारे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राबविलेल्या "माझा फळा" व "अक्षरबाग" या उपक्रमांची दखल संस्थेचे अध्यक्ष प्रकाश वैशंपायन व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे. बालकवितांच्या व बालगीतांच्या माध्यमातून अनेक शाळा व कवितांच्या माध्यमातून अनेक महाविद्यालयातून मराठी भाषेच्या समृद्धीसाठी "गीत नवे गाऊ" आणि "गप्पा-टप्पा आणि कविता" असा उपक्रम राबवताना भाषेची गोडी वाढवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रकाश वैशंपायन, उपाध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी, स्कूल कमिटी चेअरमन रमेश महाशब्दे, सेक्रेटरी हेमंत बरकले, अधीक्षिका मिना वाळुंजे, मुख्याध्यापिका सविता कुशारे व संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदनकेले आहे.

# सापतपाली येथे जखमी अवस्थेत आढळला कोकणघार पक्षी

**हरसूल ।** त्र्यंबकेश्वर तालुक्यातील हरसूल जवळील सापतपाली जिल्हा परिषद शाळेच्या आवारात कोकणघार प्रजातीचा पक्षी जखमी अवस्थेत आढळून आला असून हरसूल वनपरीक्षेत्र (प्रा) कार्यालयाकडून प्राथमिक उपचार करत नाशिक येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आल्याची माहिती वनपरीमंडळ अधिकारी अमित साळवे यांनी दिली.



सापतपाली जिल्हा परिषद शाळेच्या गेट जवळील झाडावर कोकणघार (शेराटी) प्रजातीचा पक्षी शालेय विद्यार्थ्यांना गुरुवार दि. 11) रोजी शाळा भरण्याच्या सुमारास जखमी अवस्थेत असल्याचे दिसले. सदर विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापक वसंत राऊत, उपशिक्षक पुंडलिक गायकवाड यांच्या निदर्शनास ही घटना आणून दिली.व हरसूल वन परिमंडळ अधिकारी अमित साळवे यांना भ्रमनध्वनीद्वारे कळविण्यात आले.

वनविभागाने पथकासह भेट देत जखमी अवस्थेत असलेल्या कोकणघार जातीच्या पक्षाला सिताफिने ताब्यात घेतले.व प्राथमिक उपचार करत पुढील उपचारासाठी नाशिक पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सतर्कतेमुळे जखमी अवस्थेतील कोकणघार पक्ष्याला जीवनदान मिळाले आहे. हरसूल वनपरीमंडळ अधिकारी अमित साळवे,वनरक्षक मनोहर भोये,प्रतिभा देवगिरे, ललित आहेर, सर्पमित्र प्रल्हाद पवार, मुख्याध्यापक वसंत राऊत, दिगंबर भुसारे, पुंडलिक गायकवाड आदींनी कामगिरी केली आहे.

# मंत्री कोकाटे यांनी नाशिककरांची मने जिंकली!

**नाशिक जिल्ह्यात जवळपास चार चार कॅबिनेट मंत्री असल्याने महाराष्ट्राचे लक्ष या जिल्ह्यावर जरूर आहे. असे या जिल्ह्यात काय आहे की चार कॅबिनेट मंत्री एकाच जिल्ह्याला दिले. त्यातच एकाच पक्षाचे तीन मंत्री, तर एक मंत्री अन्य पक्षाचा. मात्र गेल्या काही दिवसांपासून आठवड्यातील एक दिवस नाशिककरांना देताना माणिकराव कोकाटे यांनी कामाचा जो झपाटा सुरू केला आहे, त्यामुळे नाशिककरही अवाक् झाले आहेत. क्रीडा संघटना असो किंवा मुस्लिम जनसमुदायाच्या सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम असो, त्यांनी ज्या पद्धतीने सत्काराला उत्तर दिले त्यावरून त्यांनी कामाला जोरदार सुरुवात केली आहे असे दिसले. त्यातच मराठा समाजाने येथील कालिका माता सभागृहात सत्कार करताना त्यांनी ज्या पद्धतीने समाजासाठी आपली भूमिका मांडली, त्यावरून मराठा समाजाच्या विविध संघटना देखील भारावून गेल्या. खलील पटेल, गफूरभाई इनामदार, मिन्हाज मिर्झा, अजमल खान, आसिफभाई सय्यद, अँड. सय्यद, लियाकत शेख, अली इनामदार, अब्बू इनामदार, महसुद पीरजादा, सलील पटेल, मिनाज मिर्झा, हसन मुजावर, सोहील शेख यांच्यासह एम्स चँरिटेबल ट्रस्टने नाशिक शहरातील रोटरी क्लबच्या सभागृहात त्यांचा केलेला सत्कार हा थर चर्चेचा विषय झाला. जाकीर शिकलकर यांनी समाजाच्या व्यथा, अल्पसंख्यांक विभागाचे बजेट व शासनाकडून काय अपेक्षा आहे, याचे सविस्तर विवेचन केले. पण त्यापेक्षा या मुस्लिम समाजासाठी आपण काय करणार आहोत याचे धोरण त्यांनी जाहीर केल्यावर सभागृहात फक्त टाळ्या आणि टाळ्याच ऐकू येत होत्या. अल्पसंख्यांक विभागाच्या कार्यप्रणाली आपण कमालीच्या सुधारणा करणार आहोत व जिल्हा समितीच्या बैठका आयोजित करणार असल्याचे त्यांनी आश्वस्त केले अल्पसंख्यांक विभागासाठी जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालय नसल्याची खंतही व्यक्त केली. 'मार्टी'साठी आर्थिक तरतूद करण्यात येणार असून जवळपास शंभर मुला मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वस्तीगृह कसे उभे करता येईल ही कल्पना आपण मंत्रिमंडळापुढे मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रत्येक तालुक्यासाठी अल्पसंख्यांक भवन असावं, त्यासाठी जिल्ह्यासाठी एक कोटी तर तालुक्यासाठी एक कोटी रुपये खर्च करण्यासाठी प्रस्ताव मांडण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे नाशिक मधील मुस्लिम समाजाच्या काही जागांचा प्रश्न मंत्री नसताना व तत्कालीन मंत्री नारायण राणे यांच्या माध्यमातून आपण कशा सोडविल्या याचे विवेचन केल्यानंतर श्रोत्यांमधून काही जण उभे राहिले व आपण त्याचे साक्षीदार असल्याचे कबूल केले. त्या जागांचे मूल्य लक्षात घेता माणिकराव कोकाटे यांचे काम फारच मोठे असल्याचे सर्वांनाच जाणवले. युवक व क्रीडा खात्याबरोबरच अल्पसंख्यांक कल्याण व औकाफ खाते त्यांच्याकडे असल्यामुळे मुस्लिम समाजाला कोकाटे यांच्याकडून फार मोठी अपेक्षा होती. 'या खात्यात मी भरपूर काम करेन, अगदी मुस्लिम मंत्र्यापेक्षा जास्त कामे करणार' असे आश्वस्त करतांना त्यांनी फक्त आश्वासन दिले नाही, तर प्रत्यक्ष काय कामे करणार हे सांगितल्यानंतर मुस्लिम समुदाय देखील अवाक् झाला. आपण टीकणारी कामे करणार असून अल्पसंख्याक विद्यापीठ, स्पोर्टसह काय धोरण आखणार याचा आढावा घेतांनाच मुस्लिम समाजासाठी सर्वात जास्त काम करण्याचा मनसुबा जाहीर केला.**

















जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

**म**ध्यंतरी शहरातील विविध क्रीडा संघटनांच्या वतीने बीवायके महाविद्यालयातील गुरुदक्षिणा हॉलमध्ये त्यांचा सत्कार सोहळा करण्यात आला. मुळातच तो कार्यक्रम अतिशय देखणा झाला होता. आयोजकांनी ज्या पद्धतीने कोकाटेंकडून अपेक्षा व्यक्त केल्या, त्या ऐकल्यावर कोकाटे काय उत्तर देणार यासाठी सभागृह उत्सुक होते. परंतु नाशिककरांसाठी ऑलिंपिकच्या धरतीवर विद्यार्थी तयार व्हावे म्हणून जो आराखडा त्यांनी सांगितला, त्यावर क्रीडा संघटना कमलीच्या खुश झाल्या. अर्जुन टिळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी क्रीडा मंत्री झाल्यानंतर नाशिक मध्ये त्यांचा हा सत्कार आयोजित केला होता. तत्पूर्वी कृषिमंत्री झाल्यावर त्याच सभागृहात संपूर्ण नाशिक जिल्ह्यातील जनतेच्या वतीने झालेला सत्कार जेवढा मोठा होता, तेवढाच मोठा सत्कार क्रीडा संघटनांनी केला. यावरून मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडून नाशिक जिल्ह्याला कमालीच्या अपेक्षा असल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे एके दिवशी अतिशय पहाटे नाशिकच्या गोल्फ क्लब मैदानावर खेळाडूंना भेट देऊन त्यांनी सर्वांना चकित केले. सायकलिस्ट असोसिएशनच्या या कार्यक्रमाला येताना ते चक्क सायकलवर देखील बसले व एक राउंड मारला। मी तुमच्यातलाच एक आहे हा संदेश त्यांनी नाशिककरांना दिला. यावेळी तेथील क्रीडांगणातील असुविधा व कायम बंद पडलेले घड्याळ अशा काही बाबी नागरिकांनी त्यांना सांगितल्या. त्यावेळी या क्रीडांगणासाठी आपण विशेष निधी देणार असल्याचे जाहीर करताच गोल्फ क्लब मैदानावर सकाळी फिरायला येणारे आबालावृद्ध खुश झाले. विशेष म्हणजे गेल्या काही दिवसांपासून नाशिककरांना वेळ दिल्यानंतर आता त्यांनी महाराष्ट्राचा दौरा आखायला सुरुवात केली आहे. केंद्रीय मंत्री किरण रिजीजू यांच्यासोबत त्यांचा स्नेह सर्वांना परिचित आहे. त्यामुळे केंद्र सरकारचा मोठा निधी प्राप्त करून काहीतरी भव्य दिव्य करण्याचा त्यांचा मानस दिसून येत आहे. कृषिमंत्री पद गेल्यानंतर त्यांच्याकडे हलके खाते आले, अशी हेटाळणी सुरू झाली होती. परंतु या खात्यात भरीव असे खूप काही करण्यासारखे आहे असे मंत्री कोकाटे यांचे मत आहे. तसेच आपल्या भाषणात भारी खाते व हलके खाते असे मंत्रिमंडळात काहीच नसते. सर्व खाती सारखीच असतात. काम कसे करतो याला फार महत्त्व असते असे आत्मविश्वास पूर्ण विधान त्यांनी केले. विशेष म्हणजे संपूर्ण कार्यक्रमातून वेळ काढून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा) साठी त्यांच्याकडून जो वेळ दिला जातो, तो वाखाणण्यासारखा आहे. एका बाजूला राज्याचे मंत्रीपद व दुसऱ्या बाजूला पक्ष वाढीसाठी झोकून देणे, याबाबत माणिकरावांनी दोन पावले पुढे टाकली आहेत. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नाशिक महापालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सक्रिय होण्याचे संकेत त्यांनी दिले. ज्या सिन्नरकरांनी आपल्यावर प्रचंड प्रेम केले त्या सिन्नरकरांसाठी आपल्या खात्याच्या माध्यमातून मोठे गिफ्ट देण्याचे सूतोवाचही त्यांनी विविध कार्यक्रमातून दिले. अवघ्या पंधरा दिवसात मराठा समाज, मुस्लिम समाज, खेळाडू यांच्यासाठी त्यांनी भरपूर वेळ देऊन आपल्याला मिळालेल्या खात्यातून सर्वांना न्याय देण्यासाठी त्यांनी घेतलेली झेप नाशिककरांना सुखावून गेली.

### डॉ. हेमलता पाटलांना विश्वासात घेतल्याचे दिसले

नाशिकमधील एका कार्यक्रमात जनतेने त्यांना अनेक विषयांबद्दल माहिती दिली व त्याबाबत आपण पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. त्यावेळी व्यासपीठावर बसलेल्या माजी नगरसेविका डॉ. हेमलता पाटील यांना उद्देशून त्यांनी याबाबत आपण पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. तसेच आपण मंत्री म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात फिरणारा असल्याने नाशिककडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून आपण पुढाकार घ्यावा व सर्व कामे करून घ्यावी असे आवाहन जाहीरपणे केले. त्यामुळे तीन महिन्यात तीन पक्ष फिरलेल्या डॉक्टर हेमलता पाटील यांच्यावर पक्षाने मोठी जबाबदारी दिल्याचे जाणवले. नाशिककरांना आता आपल्या समस्या डॉ. पाटील यांच्यामार्फत मंत्री कोकाटे यांच्यापर्यंत सहज पोहोचतील असे दिसले. विशेष म्हणजे मुस्लिम समुदायाच्या त्या कार्यक्रमात कोकाटे यांच्या इतकाच डॉ. हेमलता पाटील यांच्यावर देखील लोकांचा विश्वास दिसून आला. त्या कार्यक्रमात मंत्री कोकाटे यांनी 'डॉ. हेमलता पाटील यांना बोलू द्या' असे सांगून त्यांच्यावर विश्वास देखील दाखविला. त्यामुळे नाशिकच्या राजकारणात कोकाटे यांच्या विश्वासू सहकारी म्हणून त्या प्रभावी कामगिरी करू शकतील असे दिसले.

### मंत्री कोकाटे म्हणजे मैत्रीला जागणारा मित्र

माणिकराव कोकाटे म्हणजे आक्रमक नेतृत्व हे संपूर्ण महाराष्ट्राला माहित आहे. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातून पाच वेळा निवडून आल्यानंतर कृषिमंत्री म्हणून ते महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात सहभागी झाले. कालांतराने काही अनाकलनीय घटना घडल्यानंतर कृषिमंत्री पदाऐवजी त्यांच्याकडे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक खाते देण्यात आले. पहिल्या सहा महिन्यात कृषी खात्यात कामाचा जो झपाटा त्यांनी सुरू केला होता, त्याचीच पुनरावृत्ती त्यांनी क्रीडा व युवक कल्याण खात्यातही करून दाखविली. नाशिकमध्ये महाविद्यालयीन काळातील त्यांच्या सर्व मित्रांचे त्यांच्यावर अतोनात प्रेम आहे. त्या प्रेमाला अनुसरून त्यांनी प्रत्येक मित्रांना त्यांनी आखलेल्या कार्यक्रमास वेळ दिला. प्रथम मंत्री झाल्यानंतरचा कार्यक्रम, क्रीडा संघटनांचा कार्यक्रम व मुस्लिम संघटनांचा कार्य या सर्वांना त्यांनी समान वेळ दिला. गफूरभाई इनामदार म्हणजेच नाशिकचे प्रसिद्ध 'मायओन टेलर' होय. याच मित्राच्या आग्रहास्तव मुस्लिम जनसमुदायासमोर त्यांची केलेली मित्राची स्तुती मैत्रीला जागणारी दिसली. त्यामुळे मुस्लिम समाज देखील भारावल्याचे दिसले.

# बालांगण

जिज्ञासा

## कृष्णविवर म्हणजे नेमकं काय?



हे विश्व निर्माण झालं तेव्हा केवळ हायड्रोजन आणि हेलियम ही दोनच मूलद्रव्ये प्रचंड प्रमाणात अवकाशातत तयार झाली असं मानलं जातं. इतर मूलद्रव्यं म्हणजे ऑक्सिजन किंवा नायट्रोजन वगैरे ताऱ्यांमुळे निर्माण झाले. हायड्रोजनच्या अणूकेंद्रकांचं रुपांतर हेलियममध्ये करण्यामुळे ताऱ्यांना त्यांची उर्जा मिळते. तारा कित्येक हजार अब्ज वर्षे प्रकाशाची आणि उर्जेची निर्मिती करीत राहतो. तारे जन्माला येतात तसाच त्यांचा मृत्यूही होतो. अवकाशात एखाद्या ताऱ्याचा जन्म होण्यासाठी कित्येक अब्ज वर्षे लागतात. ताऱ्यांचे आयुष्यही कित्येक अब्ज वर्षांचे असते. आपला सूर्य सुमारे ४.५ अब्ज वर्षांपूर्वी निर्माण झाला आणि त्याचा अंत अजून सुमारे ५.५ अब्ज वर्षांनी होईल. ताऱ्याच्या अंतर्भागात असलेल्या हायड्रोजन वायूच्या प्रमाणावर त्याचं आस्तित्व अवलंबून असतं. हायड्रोजनपासून हेलियम तयार होणे त्याची उर्जा अवकाशात फेकली जाणे हे सलुरू आहे तोवर तारा जीवित असतो. त्याच्या अंतर्भागातील हायड्रोजन कमी कमी होतो तसा त्याचा प्रकाश अंधूक होत जातो. अखेर हायड्रोजन पूर्णपणे संपून जातो आणि ता–याचा अंत होतो. तोच ताऱ्याचा मृत्यू. त्याजागी न दिसणारे काळे टिंब उरते तेच कृष्णविवर. कृष्णविवर म्हणजेच ब्लॅकहोल ही ताऱ्याची अंतिम स्थिती आहे.

## जग रेडिओ जॉकींचं



वेगळ्या वाटा

रेडिओ जॉकी म्हणजे आर जे होण्यासाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आकर्षक आणि स्पष्ट आवाज,लोकांशी संवाद साधण्याची कला आणि हजरजबाबीपणा. या क्षेत्रात करिअर करायचं असल्यास किमान १२ वी उत्तीर्ण असणं आवश्यक आहे. त्यानंतर कोणत्याही विषयात पदवी घेता येते. मात्र मीडियामध्ये करिअर करायचं असेल तर मास कम्युनिकेशन, जरनॅलिझम किंवा मीडिया स्टडीज यामध्ये पदवी किंवा डिप्लोमा केल्यास जास्त संधी मिळतात. यासाठी विशेष अभ्यासक्रम जसे की डिप्लोमा इन रेडिओ जॉकींग किंवा ३ ते ६ महिन्यांचे सर्टिफिकेट कोर्सेस, डिप्लोमा इन मास कम्युनिकेशन किंवा बी. ए. इन मास मीडिया करता येतात. भारतात झेवियर इंस्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन, मुंबई , इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन, दिल्ली, रेडिओ सिटी स्कूल ऑफ ब्रॉडकास्टिंग, जामिया मिलिया इस्लामिया दिल्ली आणि एफ टी आय आय, पुणे अशा संस्थांमध्ये प्रशिक्षण घेता येते. याशिवाय अनेक प्रायव्हेट ट्रेनिंग इन्स्टिटयूट्स आणि ऑनलाइन कोर्सेस देखील उपलब्ध आहेत. सुरुवातीला कॉलेज फेस्ट, स्टेज अँकरींग किंवा इव्हेंट होस्टिंग करून अनुभव घ्या. तसेच स्वतःचे पॉडकास्ट, युट्यूब किंवा इंस्टा रील्स बनवण्याचा प्रयत्न करून पाहा. रेडिओ चॅनलमध्ये इंटर्नशिप करून व्यावसायिक अनुभव घेतल्यास पुढे रेडिओ जॉकी म्हणून करिअरची सुरुवात सहज करता येते.

## लक्झेंबर्ग युरोपचे हृदय

सफर देशांची



लक्झेंबर्ग हा पश्चिम युरोपमधील एक लहान पण अत्यंत महत्त्वाचा देश आहे. या देशाची राजधानी लक्झेंबर्ग शहर असून येथे ग्रँड ड्यूक हा राज्यप्रमुख असतो. सध्या ग्रँड ड्यूक हेन्री हे राज्यप्रमुख आहेत. लक्झेंबर्ग हे संविधानिक राजेशाही पद्धतीवर चालते. देशाचे भौगोलिक क्षेत्रफळ फक्त २५८६ चौ. कि.मी. आहे. पण आर्थिक व राजकीय महत्त्वामुळे या देशाला जागतिक नकाशावर विशेष स्थान आहे. जगभरातील मोठ्या कंपन्यांची मुख्यालये किंवा युरोपियन ऑफिसेस लक्झेंबर्गमध्ये आहेत कारण इथे चांगल्या करसवलती मिळतात आणि इथली बँकिंग प्रणाली सुरक्षित आहे. लोखंड व पोलाद उद्योग हा लक्झेंबर्गचा पूर्वीचा मुख्य व्यवसाय होता. परंतु आता बँकिंग, वित्तीय सेवा, गुंतवणूक, विमा,माहिती तंत्रज्ञान हा लक्झेंबर्गच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य आधारआहे. पर्यटनातूनही या देशाला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळते.

या देशाची अधिकृत भाषा तीन आहेत. लक्झेंबर्गिश, फ्रेंच आणि जर्मन. शिक्षण व प्रशासकीय कामकाजात सर्व भाषांचा वापर होतो. लोकसंख्या अंदाजे ६.८ लाख आहे.त्यात परदेशी नागरिकांची संख्या जास्त आहे. इथली आरोग्यसेवा, सार्वजनिक सुविधा आणि राहणीमान अत्यंत उच्च दर्जाचे आहे.

जगातील सर्वांत श्रीमंत व विकसित देशांमध्ये लक्झेंबर्गचा समावेश आहे. युरोपियन युनियनच्या अनेक महत्त्वाच्या संस्था इथे आहेत, त्यामुळे लक्झेंबर्गला 'युरोपचे हृदय' म्हटले जाते. लक्झेंबर्ग शहरातील प्राचीन किल्ले आणि किल्ल्याभोवतीची वास्तुकला युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट आहे.

## रंजक फुटबॉल

फन टाईम




फुटबॉलपटू लियोनल मेस्सीला जगातल्या सर्वोकृष्ट फुटबॉलपटूचा पुरस्कार मिळाला आहे. त्याने हा पुरस्कार सहाव्यांदा पटकावला आहे. या पुरस्काराला 'बेलॉन डी ओर' (गोल्डन बॉल) असं म्हटलं जातं. हा किताब सहाव्यांदा पटकावणारा मेस्सी हा जगातला पहिलाच फुटबॉलपटू. मेस्सी अर्जेंटिनाकडून फुटबॉल खेळतो. त्याला २००९ मध्ये पहिल्यांदा या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. त्यानंतर २०१०, २०११, २०१२ आणि २०१५ मध्येही त्याला हा पुरस्कार देण्यात आला.

ख्रिस्तियानो रोनाल्डोने हा पुरस्कार पाच वेळा पटकावला आहे. फिफा विश्वचषकात सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूला 'गोल्डन बूट' किंवा 'गोल्डन शूज' हा पुरस्कार दिला जातो. १९८२ पासून या पुरस्काराला सुरूवात झाली. त्यावेळी हा पुरस्कार 'गोल्डन शू' या नावाने ओळखला जायचा. २०१० मध्ये या पुरस्काराचं नाव बदलून 'गोल्डन बूट' असं करण्यात आलं.

फुटबॉल या खेळाचा शोध चीनमध्ये लागल्याचं बोललं जातं. चीनी भाषेत या खेळाला 'कुजू' म्हटलं जायचं. २००२ मध्ये ऑलिव्हर कान या खेळाडूला 'गोल्डन बूट' पुरस्कार देण्यात आला होता. तो हा पुरस्कार मिळवणारा पहिला आणि एकमेव गोलकिपर होता. १९०० मधल्या पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेपासून फुटबॉलचा समावेश करण्यात आला. १९७३ मध्ये पहिल्यांदा फुटबॉल सामन्याचं थेट प्रक्षेपण करण्यात आलं.

ठिपके जुळवा



## कोणे एकेकाळी orkut

स्मार्ट ग्यान

दोस्तांनो, जगभरात फेसबुक, व्हॉटस ॲप वापरणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. तुमच्या पिढीला फेसबुक, व्हॉट्स ॲप शिवाय करमतच नाही. यासोबतच ट्विटर, इंस्टाग्रामसारख्या साईट्सही आहेत. या साईट्सच्या लोकप्रियतेमुळे बऱ्याच सोशल नेटवर्किंग साईट्सना गाशा गुंडाळावा लागला. अशाच काही डब्यात गेलेल्या साईट्सविषयी...

■ २०११ मध्ये धूमधडाक्यात सादर करण्यात आलेली गूगल प्लस ही साईट बंद झाली. फेसबुक, व्हॉट्स अपसारख्या सोशल नेटवर्किंग साईट्सशी स्पर्धा करणं गूगल प्लसला काही जमलं नाही. या साईटची लोकप्रियता घटत गेली. इतकंच नाही, तर ही साईट फार सुरक्षितही नव्हती. त्यामुळे एप्रिल २०१९ मध्ये ती बंद करण्यात आली.




■ साधारण दहा वर्षांपूर्वी तरुणाईमध्ये ऑर्कुट ही साईट खूप लोकप्रिय होती. फेसबुक आल्यानंतर लोकांनी ऑर्कुट वापरणं बंद केलं. यामुळे या कंपनीनेही २०१४ मध्ये गाशा गुंडाळला. ऑर्कुट आता इतिहासजमा झालं आहे.

■ ब्लॅकबेरीने आपली मेसेंजर ही इंस्टंट मेसेजिंग सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला.

■ ट्विटरची वाईन नावाची सेवा होती. कंपनीने ही सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला. ही व्हिडिओ लूप सेवा होती. याद्वारे युजर्स फक्त सहा सेकंदांचा व्हिडिओ बनवू शकत होते. मात्र स्पर्धेत ही सेवा मागे पडली.

■ १९९० मध्ये लोकप्रियतेच्या शिखरावर असणाऱ्या याहू मेसेंजरनेही गाशा गुंडाळला. याहू मेसेंजर स्पर्धेत टिकून राहू शकली नाही.

## बना टी टेस्टर



कोण होणार?

दोस्तांनो, तुमच्या घरातही आई–बाबांना, आजी–आजोबांना उठल्या उठल्या चहा लागतो का? भारतात चहाबाजांची कमतरता नाही. दररोज एकापेक्षा अधिक चहा पिणारेही बरेच आहेत. चहाशिवाय अनेकांचा दिवसही सुरू होत नाही. बाजारात वेगवेगळ्या प्रकारचे चहा उपलब्ध आहेत. या चहाची चव बघून तुम्ही भरपूर पैसे कमवू शकता, हे माहीत आहे का! यासाठी तुम्ही टी सोमिलियर किंवा टी टेस्टर बनायला हवं. या क्षेत्रात करीअर केल्यानंतर चहाच्या वेगवेगळ्या प्रकारांबद्दल तुम्ही माहिती देऊशकता. तसंच कोणत्या चहासोबत काय खायला हवं हे सुद्धा सांगू शकता. देशातल्या मोठमोठ्या हॉटेल्सना अशा टी टेस्टर्सची गरज असते. तसंच आता कॉफी शॉप्सप्रमाणे टी शॉपही सुरू झाले आहेत. या ठिकाणीसुद्धा तुम्ही काम करू शकता.

बॉटनी, फूड सायन्स तसंच हॉर्टिकल्चरचे विद्यार्थी हे क्षेत्र अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतात. बिर्ला इन्स्टीट्यूट ऑफ फ्युचरिस्टिक स्टडीज, इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ प्लांटेशन मॅनेजमेंट आणि आसाम ॲग्रीकल्चरल युनिव्हर्सिटीमध्ये या विषयाशी संबंधित अभ्यासक्रम शिकवले जातात. हा अभ्यासक्रम सहा महिने ते एक वर्षापर्यंतचा असतो. आसाम, पश्चिम बंगालमध्ये चहाचे मळे आहेत. चहाची लागवड कशी करायची, रोपट्यांची निवड कशी करायची, याबाबतचे सल्ले तुम्ही देऊ शकता. या क्षेत्रात सुरूवातीला ७ हजार ते ५० हजार रूपयांपर्यंत उत्पन्न मिळू शकतं. पुरेशा अनुभवानंतर यात वाढ होते. वेगळा पर्याय म्हणून तुम्ही टी टेस्टींगची वाट निवडू शकता.

जिज्ञासा

### ओळखा पाहू

१) जगातलं पहिलं वर्तमानपत्र कोणत्या देशात सुरू झालं?
२) 'अल खझ्नेह' ही ऐतिहासिक वास्तू कुठे आहे?
३) काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर सुभाषचंद्र बोस यांनी कोणत्या पक्षाची स्थापना केली?
४) 'बुद्ध चरिता' या ग्रंथाचा लेखक कोण?
५) चीनी प्रवासी हियुइन टी सँगने कोणत्या विद्यापीठातून शिक्षण घेतलं?
६) कापड उद्योगासाठी कापसाची लागवड सर्वप्रथम कुठे करण्यात आली?
७) संपूर्ण भारतावर राज्य करणारा पहिला भारतीय राजा कोणता?
८) थोर संस्कृत व्याकरणकार पाणिनी यांचा काळ कोणता?
९) देशात मुघल साम्राज्याची सुरूवात खऱ्या अर्थाने कोणत्या लढाईनंतर झाली?
१०) २०२० मध्ये २०–२० क्रिकेटचा विश्वचषक कोणत्या देशात झाला?

उत्तरं : १) चीन २) पेत्रा ३) फॉरवर्ड ब्लॉक ४) अश्वघोष ५) नालंदा ६) इजिप्त ७) चंद्रगुप्त मौर्य ८) ख्रिस्तपूर्व सहाव्या आणि पाचव्या शतकादरम्यान ९) पानिपतची दुसरी लढाई १०) ऑस्ट्रेलिया

## सियाचिनविषयी...

गंमत जंमत

दोस्तांनो, तुम्ही ग्लेशियर्सबद्दल ऐकलं आहे का? ग्लेशियर्स म्हणजे हिमनदी. आपल्या देशात सियाचिन हे ग्लेशियर आहे. सियाचिनमध्ये आपले सैनिक अहोरात्र पहारा देत असतात. इथलं तापमान खूप कमी असतं. मात्र अशा वातावरणातही आपले सैनिक डोळ्यात तेल घालून आपल्या सीमांचं रक्षण करतात. हिमालयातल्या पूर्व काराकोरम पर्वतरांगांमध्ये सियाचिन वसलं आहे. सियाचिन ही जगातली सर्वात उंचावरची युद्धभूमी आहे.



सियाचिनवर पाकिस्तानचा डोळा आहे. त्यामुळे आपल्या सैनिकांना हुडहुडी भरवणाऱ्या थंडीतही तिथे रहावं लागतं. सियाचिन परिसरातलं तापमान उणे साठ अंश सेल्सियसच्या खालीही जाऊ शकतं. आपल्याला थंडी वाजू लागल्यावर आपण लगेच स्वेटर घालतो. आपल्याला थोडी थंडीही सहन होत नाही. पण सैनिक देशासाठी लढत असतात. इतकंच नाही, तर इथे ऑक्सिजनचं प्रमाणही कमी असतं. या भागात फक्त दहा टक्के ऑक्सिजन असल्यामुळे सैनिकांपुढे मोठं आव्हान असतं. सियाचिनमध्ये भारताचे तीन हजार सैनिक नेहमी तैनात असतात. प्रत्येक सैनिक साधारण तीन महिने या भागात रहतो. प्रतिकूल तापमानामुळे कोणीही तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ सियाचिनमध्ये राहू शकत नाही. तिथे एक बादली पाणी गरम करण्यासाठी सुमारे तीन तास लागतात. पाणी पिण्यासाठी सैनिकांना बर्फ स्टोव्हवर वितळून घ्यावा लागतो. मशिन गन्स जाम होऊन नयेत म्हणून उकळत्या पाण्यात बुडवून ठेवल्या जातात!

चित्र रंगवा



दोस्त हे मस्त

### प्राण्यांची अजब दुनिया

छोट्यांनो, प्राण्यांच्या जगात बरंच काही घडत असतं. प्राण्यांचं जगही अनोखं आहे. आता हत्तीचंच बघा. हत्तीला उडी मारता येत नाही. उडी मारता न येणारा हत्ती हा एकमेव प्राणी आहे. आपल्या आसपास दिसणाऱ्या मुंग्या कधी झोपत नाहीत. शिवाय त्यांना फुफ्फुसही नसतं. ब्लू व्हेलच्या जिभेचं वजन एखाद्या कारएवढं किंवा हत्तीच्या पिल्लाएवढं असतं. गाय आपल्या आयुष्यात जवळपास दोन लाख ग्लास दूध देते.



खादाडी

### स्टफ्ड रोटी

मुलांनो. उरलेल्या पोळीपासून स्टफ्ड रोटी बनवता येईल. यासाठी दोन ते चार पोळ्या, एक वाटी उकडलेल्या भाज्या, एक बारीक चिरलेली काकडी, बारीक चिरलेले दोन टोमॅटो आणि एक कप किसलेलं चीज असं साहित्य घ्या. आता एक पोळी घ्या. त्यावर उकडलेल्या भाज्या घाला. त्यावर टोमॅटो आणि काकडी घाला. त्यावर चीज घाला. यानंतर पोळी दुमडून घ्या. आता ही पोळी तव्यावर भाजून घ्या. गरमागरम खा.



स्टडी टिप्स

### गोडी गणिताची

मुलांनो, गणितात चांगले गुण मिळवायचे असतील तर आपल्या आयुष्यातली गणितं सोडवायला सुरूवात करा. आपल्या वाढदिवसापासून सुरुवात करा. वाढदिवसाच्या खर्चाचा हिशेब तुम्हीच मांडा. वाढदिवसाला किती मित्रमैत्रिणी येणार, त्यांच्यासाठी किती वस्तू लागतील, कोणते गेम्स खेळावे लागतील हे सगळं तुम्हीच ठरवा. अशा छोट्या छोट्या गोष्टींमधून तुम्ही गणित शिकत जाल आणि पुढे गणिताची गोडी लागेल.



योगा टाईम

### करा उदानमुद्रा योग

दोस्तांनो, योगासनांमुळे आपलं सर्वांगिण आरोग्य उत्तम राहतं. आपण तंदुरूस्त राहतो. इतकंच नाही, तर आरोग्यविषयक समस्याही दूर होतात. चेहरा तजेलदार दिसण्यासाठी तुम्ही उदानमुद्रा योग करू शकता. मुद्रेमुळे चेहरा खूप छान, उजळ दिसतो. हे आसन करण्यासाठी तुम्हाला पद्मासनात बसावं लागेल.



# शेअर बाजार सलग 8 व्या दिवशी वाढीसह बंद

## गुंतवणूकदारांना 1.56 लाख कोटींचा नफा



मुंबई, दि. १२ प्रतिनिधी

आठवड्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे शुक्रवारी शेअर बाजार वाढीसह बंद झाला. दोन्ही बेंचमार्क निर्देशांक हिरव्या चिन्हावर बंद झाले. सेन्सेक्स तब्बल ३५६ अंकांनी उसळला, तर निफ्टी ५० मध्ये १०८ अंकी वाढ झाली.

शुक्रवारी सकाळी सेन्सेक्सने ८१,७५८ पातळीवर सुरुवात केली होती आणि दिवसाच्या शेवटी ०.४४ टक्क्यांच्या वाढीसह ८१,९०४ पातळीवर बंद झाला. निफ्टी ५० ने २५,०७४ पातळीवर ओपनिंग दिली होती आणि दिवसअखेर ०.४३ टक्क्यांच्या वाढीसह २५,११४ पातळीवर बंद झाला. बेंचमार्क निर्देशांकांच्या तुलनेत मिडकॅप आणि स्मॉलकॅप विभागाची कामगिरी थोडी कमी राहिली. बीएसई मिडकॅप निर्देशांक ०.०९ टक्क्यांनी वाढून बंद झाला, तर स्मॉलकॅप निर्देशांक ०.२७ टक्क्यांनी चढला.

या कालावधीत बीएसईवरील सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल मागील सत्रातील ४५७ लाख कोटी रुपयांवरून सुमारे ४५९ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले. यामुळे गुंतवणूकदारांना एका सत्रातच तब्बल १.५६ लाख कोटी रुपयांचा नफा झाला.

निफ्टी ५० कंपन्यांमध्ये सर्वाधिक फायदा भारत इलेक्ट्रॉनिक्सला झाला, ज्यामध्ये ३.६ टक्क्यांची उसळी दिसली. त्यानंतर बजाज फायनान्समध्ये ३.४१ टक्के, बजाज फिनसर्वमध्ये २.१५ टक्के, हिंडाल्कोमध्ये २.०८ टक्के आणि श्रीराम फायनान्समध्ये २.०७ टक्क्यांची वाढ नोंदली गेली.

**सेन्सेक्स 81,548**

**निफ्टी 25,005**

निफ्टी ५० मधील सर्वाधिक नुकसान इटरनलला झाले, जो २ टक्क्यांनी घसरला. त्यानंतर हिंदुस्तान युनिलिव्हर लिमिटेड १.५९ टक्के, बजाज ऑटो १.२६ टक्के, इंडसइंड बँक १.०९ टक्के आणि ट्रेंट ०.८० टक्क्यांनी घसरले.

शुक्रवारी बहुतांश क्षेत्रीय निर्देशांक हिरव्या चिन्हावर बंद झाले. तरीसुद्धा काही क्षेत्रांमध्ये घसरण झाली. सर्वाधिक घसरण एफएमसीजी क्षेत्रात झाली, जो ०.७१ टक्क्यांनी घसरला. त्यानंतर निफ्टी मीडिया ०.३९ टक्के आणि निफ्टी इंडिया कंझ्युमर ०.२९ टक्के लढखडले.

सर्वाधिक फायदा संरक्षण क्षेत्राला झाला, जो ४ टक्क्यांपेक्षा जास्त वाढला. त्यानंतर निफ्टी सीपीएसईमध्ये १.०४ टक्के, निफ्टी कॅपिटल मार्केटमध्ये ०.९९ टक्के, निफ्टी मेटलमध्ये ०.९३ टक्के, निफ्टी पीएसईमध्ये ०.७१ टक्के, निफ्टी फार्मामध्ये ०.५३ टक्के आणि निफ्टी ऑटोमध्ये ०.४६ टक्क्यांची वाढ झाली.

# “तुम्ही लोकसभा अध्यक्षांचे ऐकत नाही, मग...”

## राहुल गांधी व मंत्री दिनेश सिंह यांच्यात भर बैठकीत खडाजंगी

नवी दिल्ली, दि. १२ वृत्तसंस्था

लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि उत्तर प्रदेश सरकारमधील मंत्री दिनेश प्रताप सिंह यांच्यात एका बैठकीत जोरदार खडाजंगी झाल्याचं पाहायला मिळालं आहे. रायबरेली मतदार संघातील निधीवरून दोघांमध्ये वाद झाला. या मतदारसंघाला खूप उशिराने निधी मिळतोय, असं म्हणत राहुल गांधी यांनी नाराजी व्यक्त केली होती. तसेच ते म्हणाले की “मी दिशा बैठकीचा अध्यक्ष आहे. त्यामुळे मला विचारून चर्चा व्हायला हवी.” यावर दिनेश सिंह म्हणाले, “तुम्ही लोकसभेत अध्यक्षांचं ऐकत नाही. मग इथे आम्ही तुमचं का ऐकावं?”



राहुल गांधी हे सध्या त्यांच्या मतदारसंघात म्हणजेच रायबरेलीमध्ये फिरत आहेत. आज (१२ सप्टेंबर) रायबरेलीत ‘दिशा’ बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. या बैठकीवेळी त्यांचा मंत्री दिनेश सिंह यांच्या शाब्दिक वाद झाले. या बैठवेळी दिनेश प्रताप सिंह यांनी असे काही मुद्दे मांडले ज्याबद्दल बैठकीतील इतर सदस्यांना कल्पना देण्यात आली नव्हती. त्यावरून राहुल गांधी म्हणाले, “मी दिशा बैठकीचा अध्यक्ष आहे, त्यामुळे मला विचारून चर्चा व्हायला हवी.” यावर दिनेश सिंह म्हणाले, “लोकसभेत तुम्ही लोकसभा अध्यक्षांचं ऐकत नाही. मग इथे मी तुमचं ऐकायला बांधील नाही.” सिंह यांच्या या वक्तव्यामुळे बैठकीतील वातावरण अजून तापलं.

दोन्ही नेत्यांमधील वादाचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. यामध्ये राहुल गांधी व दिनेश सिंह यांच्यात तू-तू, मैं-मैं चालू असल्याचं पाहायला मिळत आहे. दिनेश प्रताप सिंह हे पूर्वी काँग्रेसमध्ये होते. काँग्रेसमध्ये असताना ते गांधी कुटुंबाच्या जवळचे असल्याचं सांगितलं जात होतं. परंतु, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीआधी त्यांनी काँग्रेसला रामराम करत भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला.

दिनेश सिंह यांनी २०१९ मध्ये भाजपाच्या तिकीटावर रायबरेलीमधून सोनिया गांधी यांच्याविरोधात लोकसभा निवडणूक लढवली होती. मात्र, त्यांना १.६७ लाख मतांनी पराभव पत्करावा लागला. २०२४ मध्ये देखील भाजपाने त्यांना रायबरेलीतून लोकसभेचं तिकीट दिलं होतं. यावेळी राहुल गांधी यांनी त्यांचा ३.९० लाख मतांनी पराभव केला. त्यानंतर भाजपाने त्यांना विधान परिषदेवर पाठवलं. तसेच, त्यांच्याकडे फलोत्पादन, कृषी निर्यात, परदेशी व्यापार राज्यामंत्रिपद (स्वतंत्र कार्यभार) सोपवण्यात आलं आहे.

# वर्धा-नागपूरमध्ये रात्रभर गोंधळ: वाहतूक ठप्प, संतप्त नागरीक रस्त्यावर!

वर्धा, दि. १२ प्रतिनिधी

वर्धा आणि नागपूर परिसरात कालच्या रात्रीपासून सुरू झालेल्या घडामोडींनी नागरिकांना अक्षरशः हैराण केलं आहे. एकीकडे मुसळधार पावसामुळे वाहतूक ठप्प झाली तर दुसरीकडे सकाळी शालेय विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या बसचा भीषण अपघात झाला. या दोन्ही घटनांमुळे जिल्ह्यात तणावाचं वातावरण आहे.

वर्धा जिल्ह्यात रात्री उशिरा झालेल्या मुसळधार पावसाने देवळी तालुक्यातील यशोदा नदीला पूर आला. सरूळ शिवारातील पुलावरून पाणी वाहू लागल्याने वर्धा–राळेगाव मार्गावरील वाहतूक सकाळपासून बंद झाली आहे. इतकंच नव्हे, तर हिंगणघाट तालुक्यातही अल्लीपुर–अलमडोह मार्ग वाहतुकीसाठी बंद पडला असून पाण्याचा प्रवाह ओसरल्याशिवाय रस्ते मोकळे होण्याची शक्यता नाही. त्यामुळे नागरिक आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरं जावं लागत आहे.

दरम्यान, नागपूरच्या मानकापूर परिसरात आज सकाळी शालेय विद्यार्थ्यांची बस अपघातग्रस्त झाली. या भीषण अपघातात सात विद्यार्थी जखमी झाले असून परिसरात प्रचंड संताप उसळला आहे. अपघातानंतर संतप्त नागरिकांनी उड्डाणपुलावरील वाहतूक रोखत घोषणाबाजी केली. त्यामुळे नागपूरमध्ये काही तास वाहतुकीचा गोंधळ निर्माण झाला. मुसळधार पाऊस आणि अपघाताच्या दुहेरी धक्क्यामुळे जिल्ह्यातील सामान्य नागरिकांचे हाल वाढले आहेत. वर्ध्यात वाहतूक ठप्प तर नागपुरात आक्रमक झालेल्या नागरिकांमुळे प्रशासनावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. पुढील काही तासांत पाऊस ओसरतो का आणि परिस्थिती नियंत्रणात येते का, याकडे साऱ्यांचे डोळे लागले आहेत.

# “निकाल देण्याव्यतिरिक्त सर्व गोष्टी करायचे”

## सरन्यायाधीशांनी सांगितला मुंबई हायकोर्टातील सहकाऱ्याचा किस्सा

नवी दिल्ली, दि. १२ वृत्तसंस्था

राज्य विधिमंडळांनी मंजूर केलेल्या विधेयकांना संमती देण्यासाठी राष्ट्रपती किंवा राज्यपालांना कालमर्यादा निश्चित करावी का यासंदर्भातील याचिकांवर १० दिवसांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी आपला निर्णय राखून ठेवला. या १० दिवसांमध्ये सर्वोच्च न्यायालयात जोरदार युक्तीवाद झाला.

दरम्यान, सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी यावेळी एक किस्सा सांगितला, ज्यामुळे न्यायालयात एकच हशा पिकल्याचे पाहायला मिळाले. ५ न्यायाधीशांच्या आणि वकिलांच्या खंडपीठाने ब्रेक घेतला, तेव्हा सरन्यायाधीश बी. आर. गवई यांना त्यांच्या जुन्या सहकाऱ्याची आठवण आली आणि म्हणाले, “माझा एक जुना न्यायमूर्ती सहकारी निकाल देण्याव्यतिरिक्त सर्व गोष्टी करत असे.”

या खंडपीठात सरन्यायाधीश बी. आर. गवई, न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती विक्रमनाथ, न्यायमूर्ती पीएस नरसिंह आणि न्यायमूर्ती एएस चांदुरकर यांचा समावेश होता. सर्व न्यायमूर्ती अचानक आपापसात बोलू लागले, त्यानंतर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले, “मी लिप रीडिंग शिकलो असतो तर बरे झाले असते. जेव्हा आपण युक्तिवाद सादर करत असतो आणि न्यायमूर्ती आपापसात बोलत असतात तेव्हा मी अंदाज लावत राहतो.”

यावर सरन्यायाधीशांनी उत्तर दिले, “गेल्या ३ आठवड्यांपासून जो युक्तीवाद ऐकला त्याबद्दल आम्ही बोलत नव्हतो. हे आमच्या मुंबई उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती सहकाऱ्यासारखे नाही, जे दीर्घकाळ चालणाऱ्या युक्तिवादादरम्यान चित्र काढायचे, लाकडी कोरीव काम करायचे आणि निकाल देण्याव्यतिरिक्त इतर अनेक गोष्टी करायचे.”

यादरम्यान, सरन्यायाधीशांनी वकिलांच्या वाचनाच्या गतीबद्दल आश्चर्य व्यक्त केले आणि ते म्हणाले की, ते त्याची बरोबरी करू शकत नाहीत. ते म्हणाले, “मी २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती झालो. ६ वर्षांनंतरही, मी दिल्लीतील वकिलांशी ताळमेळ ठेवू शकत नाही, जे पहिले वाक्य वाचतात आणि नंतर दुसऱ्या वाक्याकडे जाण्यापूर्वीच ते १० वे वाक्य वाचत असतात. न्यायमूर्ती नरसिंह वगळता, खंडपीठामधील आमच्यापैकी इतर चौघांना सर्वोच्च न्यायालयाच्या वकिलांशी ताळमेळ राखणे खूप कठीण जाते.”

# भारत-पाकिस्तान सामन्याकडे चाहत्यांची पाठ



दुबई, दि. १२ वृत्तसंस्था

आशिया कपमधील सर्वात हायव्होल्टेज ड्रामा १४ सप्टेंबरला खेळविला जाणार आहे. पहलगामचा क्रूर दहशतवादी हल्ला आणि भारताने राबविलेले ऑपरेशन सिंदूर यानंतर भारत आणि पाकिस्तान हे पारंपरिक प्रतिस्पर्धी एकमेकांसमोर पहिल्यांदाच उभे ठाकणार आहेत. अशातच या सामन्याची तिकीटे काळ्या बाजारातही मिळेनासी व्हायला हवी होती, परंतु या सामन्याची तिकिटेच खपत नाहीत.

भारत आणि पाकिस्तान सामन्यावर पहिल्यांदाच अशी वेळ आली आहे. ११ सप्टेंबरच्या सायंकाळपर्यंत या सामन्याची ५० टक्क्यांहून अधिक तिकीटे उपलब्ध होती. क्रिकेटरसीक तिकीटेच खरेदी करत नाहीएत. दुबईच्या इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडिअमवर हा सामना होत आहे. याच स्टेडिअमवर झालेल्या २०२३ च्या चॅम्पिअन्स ट्रॉफी सामन्याची तिकीटे अवघ्या ४ मिनिटांत संपली होती.

या सामन्याच्या उपलब्ध असलेल्या तिकिटांमध्ये सुरुवातीची किंमत ९९ अमेरिकन डॉलर (८७४२ रुपये) ते प्रीमियम सीट्सची किंमत ४,५३४ अमेरिकन डॉलर (सुमारे ४ लाख रुपये) सर्वच प्रकारातील तिकीटे रिक्त आहेत. महत्वाचे म्हणजे २९ ऑगस्टला या तिकिटांच्या विक्रीला सुरुवात झाली आहे. आज याला १५ दिवस झाले तरी देखील ५० टक्क्यांहून अधिक तिकीटे विकली गेलेली नाहीत.

भारत पाकिस्तान सामन्यावर बहिष्कार टाकण्याची मागणी जोर धरत आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर काही भारतीय क्रिकेटरांसह अनेकांनी या सामन्यावर भारतीय संघाने बहिष्कार टाकावा अशी मागणी केली होती. यानंतर भारत सरकारने भारत-पाकिस्तान यांच्यात स्पर्धा होणार नाही परंतू आंतरराष्ट्रीय स्पर्धांत खेळू शकतील अशी स्पष्टोक्ती दिली होती. बीसीसीआयच्या पथ्थ्यावर पडणारा निर्णय घेण्यात आला होता. तरीही भारतीय क्रिकेटरसिकांना हे फारसे रुचलेले दिसत नाही.

# एआय द्वारे कर्करोगाचे निदान अधिक सोपे

**मागील काही महिन्यापासून सर्वच क्षेत्रात सातत्याने ए आय चा सातत्याने उल्लेख होताना दिसतो आहे. ए आय अर्थात आर्टिफिशिअल इंटीलीजेंस म्हणजेच कृत्रिम प्रज्ञा. विज्ञानाची क्रांती इतक्या झपाट्याने होतेय कि ती आता ए आय तंत्रापर्यंत येऊन पोहचलेली आहे. याच ए आय च्या माध्यमातून सर्वच क्षेत्रातील कठीण गोष्टी या सुलभ होणार आहेत. वैद्यकीय क्षेत्रात देखील याच ए आय तंत्राच्या द्वारे कर्करोगासारख्या जीवघेण्या आजाराचे निदान करणे अगदी सोपे होणार आहे. याच अनुषन्गाने स्पेशालिटी सर्जिकल ऑन्कोलॉजी कँसर हॉस्पिटलचे डॉ. संकेत मेहता यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.**

साप्ताहिक संवाद

१] ए आय आधारित कॅन्सरचे निदान नेमके कसे सोपे झालेले आहे ?

ए आय आधारित कॅन्सरचे अगदी सहज निदान करणे आता शक्य झालेले आहे. क्युअर ए आईचे ए आय आधारित इन्सिडेंटल पल्मोनरी नोंदूल डिटेक्शन टूल कँसर उपचार प्रक्रियेत वापरले जाणार आहे. हे साधन फुफ्फुसातील ६ मिमी एवढ्या लहान गाठीहि छातीच्या सध्या एक्स रे मधून शोधू शकते. त्यामुळे फुफ्फुसाचा कर्करोग लवकर ओळखता येऊन वेळीच उपचार करता येणे शक्य होणार आहे. गाठीचे निदान होताच रुग्णला शल्यविशारद,फुफ्फुसरोगतज्ज्ञ आणि कँसर तज्ज्ञांशी सहज जोडता येणार आहे.

२]हे निदान साधन कशा प्रकारे मदत करते?

फुफ्फुसातील गाठी म्हणजे बहुदा लहान ठिपके असतात जे बहुदा यासंबंधित कारणामुळे रुग्णाच्या छातीचा एक्सरे किंवा सिटी स्कॅन केल्यावर योगायोगाने आढळतात. अनेक गोष्टी निरुपद्रवी असतात. परंतु काही सुरवातीच्या टप्प्यातील फुफुसाचा कर्करोग असू शकतो. या गाठी लवकर शोधणे आणि त्यांचे निरीक्षण करणे महत्वाचे आहे. कारण फुफुसाच्या कर्करोगाचे दुसऱ्या किंवा तिसऱ्या ट्प्पायचे निदान हे पहिल्या टप्पयात आढळलेल्यया कर्करोगाला सुधारण्यास मदत करते. एकदा कर्करोग आल्यानंतर रुग्णाला थोरॅसिक सर्जन ,फुफुसशाश्त्रज्ञ आणि कर्करोगतज्ञाशी जोडून लवकरात लवकर उपचार सुरु करता येतात. निदान आणि उपचार जलद गतीने करून रुग्णाचे प्राण वाचविण्यासाठी हे ए आय तंत्र फायद्याचे ठरणार आहे.

लोकरंग

३]याच तंत्राच्या आधारे इतर प्रकारचे कर्करोग देखील शोधता येणार आहेत का?

होय फुफ्फुसाच्या कर्करोगाप्रमाणेच ए आय तंत्राचा वापर करून अन्न नलिकेच्या किंवा तोंडाच्या कर्करोगाचे देखील निदान करता येणे शक्य होणार आहे. तसेच पुरुषांमध्ये आढळणाऱ्या अंडकोशाच्या कर्करोगाचे,महिलांमधील स्तनाच्या कर्करोगाचे,रक्ताच्या कर्करोगाचे देखील निदान आता सहज शकय होणार आहे. निदान आणि शस्त्रक्रियेची आखणी यात ए आय चा वापर केल्याने आता रुग्णाच्या आजाराचे वेळीच निदान होऊन योग्य उपचारांद्वारे रुग्णाला जीवदान मिळणार आहे

## लडाख मॅरेथॉनची १२ व्या आवृत्तीसाठी स्निकर्स, पुमा, बिस्लेरी यांच्याशी हातमिळवणी



जगातील सर्वात उंच एआयएमएस-प्रमाणित मॅरेथॉन असलेल्या लडाख मॅरेथॉनने या सप्टेंबरमध्ये विक्रमी सहभागासह १२ व्या आवृत्तीत प्रवेश करत सात भागीदारांसह आपला कॉर्पोरेट पाठिंबा बळकट केला आहे. ११ ते १४ सप्टेंबर दरम्यान नियोजित या मॅरेथॉनमध्ये भारत आणि इतर ३० देशांमधून ६,६०० हून अधिक धावपटू एकत्र येतील, जे त्याच्या इतिहासातील सर्वात मोठे क्षेत्र आहे, तसेच लक्षणीय व्यावसायिक रस आकर्षित करत राहतील आणि जागतिक स्तरावर एक प्रमुख धावण्याच्या कार्यक्रम म्हणून आपले स्थान मजबूत करत राहतील.

या प्रयत्नाचा एक भाग म्हणून खात्री करण्यासाठी, प्रशासकीय समर्थक, लडाख केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासन विशेषतः लडाख पोलिस आणि लेहचे आरोग्य विभाग लडाख स्वायत्त टेकडी विकास परिषद, भारतीय हवाई दल, भारतीय लष्कर, भारतीय लष्कराचे अग्निशमन आणि फ्युरी कॉर्प्स, सीमा रस्ते संघटना आणि २७ स्थानिक समुदाय यांच्याकडून महत्त्वाची ऑन-ग्राउंड मदत पुरवली जाईल. त्यांच्या लॉजिस्टिक समर्थनामुळे लेह, खारदुंग ला आणि नुब्रा येथे सुरक्षित आणि अखंड अंमलबजावणी होईल.


या पायावर उभारलेले, २०२५ साठी कॉर्पोरेट रोस्टर कार्यक्रमाची प्रतिष्ठा आणखी वाढवते. स्निकर्स हंगर पार्टनर म्हणून सामील होत आहे

क्रीडांगण

, तर पुमा अपॅरल पार्टनर म्हणून त्यांची भूमिका मजबूत करणार आहे आणि बिस्लेरी हायड्रेशन पार्टनर म्हणून सुरू राहणार आहे. एनरझल एनर्जी पार्टनर म्हणून, हॉटेल ग्रँड ड्रॅगन, लेह हॉस्पिटॅलिटी पार्टनर म्हणून, अकॉर्ड हॉस्पिटल हेल्थ पार्टनर म्हणून आणि बजाज अलियान्झ इन्शुरन्स पार्टनर म्हणून काम करेल. एकत्रितपणे, या भागीदारी लडाख मॅरेथॉन जागतिक दर्जाचे क्रीडा आव्हान आणि प्रभावी ब्रँड सहकार्यासाठी एक व्यासपीठ कसे विकसित झाले आहे ते अधोरेखित करतात.

## ऐतिहासिक पुणे

पुणे म्हटलं कि महाराष्ट्रातील ऐतिहासिक पर्यटन स्थळ. पुणे शहराला विद्येचं माहेर घर आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखलं जातं. पुणे शहरात अनेक पर्यटन स्थळं आहेत. ज्यामुळे अनेक पर्यटक विकएन्डला पुण्याला फिरायला जाण्याचा बेत आखतात. पुणे शहर मुंबई शहरापासून जवळ असल्याने शनिवार आणि रविवार पुण्यातील पर्यटन स्थळांना भेट देण्यास काहीच हरकत नाही. पुणे शहराला स्वतःची एक ओळख, संस्कृती आणि



चला पर्यटनाला

इतिहास आहे. पुणे शहरात कोणत्याही ऋतूत आल्हाददायक वातावरण असते..

शनिवार वाडा म्हणजे पुणे शहरातील एक ऐतिहासिक वास्तू. शनिवार वाडा ही पेशवेकालीन वास्तू आहे. या ठिकाणी पेशव्यांचे निवासस्थान होते. पहिले बाजीराव पेशवा यांनी सन 1736 साली हा राजवाडा बांधला होता. त्या काळी या वाडा पुण्याच्या वैभवशाली संस्कृतीचे प्रतिक मानले जायचा. मात्र इंग्रजांनी या वाड्यावर कब्जा केला आणि हा वाडा जाळून टाकला. आता या वास्तूंमधील सर्व अवशेष नष्ट झाले आहेत. वाड्याचा पाया आणि तटबंदीचा भाग आजूनही कायम आहे. हा वाडा पाहताना एक ऐतिहासिक वास्तू पाहण्याचा आनंद तुम्हाला नक्कीच मिळू शकतो.


गांधी मेमोरिअल सोसायटीचा हा आगा खान पॅलेस इटालियन बनावटीचा आहे. ब्रिटीश राजवटीमध्ये या पॅलेसचा उपयोग भारत छोडो आंदोलनात महात्मा गांधी, कस्तूरबा गांधी,महादेव भाई यांच्यासाठी तुरूंगासाठी करण्यात आला होता. असं म्हणतात की महादेव भाई आणि कस्तूरबा गांधी यांनी याच पॅलेसमध्ये अखेरचा श्वास घेतला होता. या पॅलेसमध्ये त्यांचे स्मारकदेखील आहे.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# कंगना रणौत यांना सुप्रीम कोर्टचा दणका

नवी दिल्ली, दि. १२ वृत्तसंस्था

बॉलिवूड अभिनेत्री आणि भारतीय जनता पक्षाची (भाजप) खासदार कंगना रणौत यांना सुप्रीम कोर्टाकडून मोठा धक्का बसला आहे. २०२०-२१ च्या शेतकरी आंदोलनाशी संबंधित एका रिट्विटवरील तिच्या टिपणीविरोधात दाखल केलेली मानहानीची याचिका त्यांनी मागे घेतली आहे.



सुप्रीम कोर्टाने तिच्या याचिकेवर सुनावणी घेण्यास स्पष्ट नकार दिला आणि सांगितले की ती खालच्या न्यायालयात आपली बाजू मांडू शकते. हा खटला कंगनाच्या त्या रिट्विटशी संबंधित आहे, ज्यात तिने एका वृद्ध महिला आंदोलनकर्तीबद्दल टिप्पणी केली होती आणि ती मानहानीकारक मानली गेली होती.

कंगनाच्या या टिप्पणी नंतर पंजाबमधील बठिंडा येथील ७३ वर्षीय महिंदर कौर यांनी तिच्याविरुद्ध मानहानीचा खटला दाखल केला. हा खटला आणखी गंभीर झाला, जेव्हा पंजाब आणि हरियाणा हायकोर्टानेदेखील कंगनाची याचिका फेटाळून लावली होती. आता सुप्रीम कोर्टाच्या या भूमिकेमुळे कंगनाची कायदेशीर लढाई आणखी कठीण झाली आहे.

सुप्रीम कोर्टातील न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने कंगनाच्या याचिकेवर सुनावणी केली. सुनावणी सुरू होताच न्यायमूर्ती मेहतांनी कंगनाच्या टिप्पणीवर प्रश्न उपस्थित केला.

त्यांनी सांगितले, "हा काही साधा रिट्विट नव्हता. तुम्ही त्यात स्वतःची टिप्पणी जोडली, मसाला घातला." कंगनाच्या वकिलांनी सफाई देण्याचा प्रयत्न केला आणि सांगितले की त्यांच्या अशिलानी आपल्या टिप्पणीवर स्पष्टीकरण दिले आहे. मात्र कोर्टाने स्पष्ट केले की हे स्पष्टीकरण खालच्या न्यायालयात दिले जाऊ शकते.

# मणिपूरसह तीन राज्यांच्या दौऱ्यावर पंतप्रधान मोदी

## ७,३०० कोटींच्या विकास प्रकल्पांची भेट

इंफाळ, दि. १२ वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी असमसह तीन ईशान्येकडील राज्यांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात पंतप्रधान १३ सप्टेंबर रोजी मणिपूरमधील चुराचांदपूर येथील पीस ग्राउंडवरून ७,३०० कोटींच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी करतील. चुराचांदपूर हा कुकी बहुसंख्य असलेला जिल्हा आहे. २०२३ मध्ये राज्यात उसळलेल्या जातीय हिंसाचारानंतर पंतप्रधान मोदींचा हा पहिलाच दौरा असेल.

पंतप्रधान मोदी इंफाळ (जो मैतेयी बहुसंख्य असलेला भाग आहे) येथून १,२०० कोटींच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचे उद्घाटनही करतील. पंतप्रधानांच्या या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर इंफाळ व चुराचांदपूर जिल्हा मुख्यालयांमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

मणिपूरमध्ये मे २०२३ पासून मैतेयी आणि कुकी समाजांमधील जातीय हिंसाचारात आतापर्यंत २६० लोकांचा मृत्यू झाला असून हजारो लोक बेघर झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून असा तर्क लावला जात होता की पंतप्रधान मोदी मिजोरामच्या अधिकृत भेटीसोबत मणिपूरलाही भेट देतील; मात्र सरकार किंवा भाजपकडून याची अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नव्हती.

# तिन्ही सैन्यदलांच्या दहा महिला अधिकारी जगभ्रमणासाठी रवाना

मुंबई, दि. १२ प्रतिनिधी

रक्षा मंत्री राजनाथ सिंह यांनी गुरुवारी तिन्ही सैन्यदलांच्या पहिल्या महिला जलयात्रा मोहिमेला हिरवा झेंडा दाखवत शुभारंभ केला. तिन्ही सैन्यदलांच्या दहा महिला अधिकारी पुढील नऊ महिन्यांत जगातील काही अतिशय धोकादायक समुद्री मार्गासह सुमारे २६ हजार नॉटिकल माईल अंतराची यात्रा करतील.

या अधिकारी स्वदेशी नौकायन पोत आयएएसव्ही त्रिवेणी मधून प्रवासाला निघाल्या आहेत. समुद्री मार्गाने होणाऱ्या या विश्वभ्रमण मोहिमेला समुद्र प्रदक्षिणा* असे नाव देण्यात आले आहे. जगात अशा प्रकारची ही पहिली त्रिसेवा (आर्मी-




नेव्ही-एअरफोर्स) मोहीम असल्याचे सांगण्यात येत आहे.

मुंबईच्या गेटवे ऑफ इंडिया येथून ही मोहीम सुरू झाली असून रक्षा मंत्र्यांनी दिल्लीहून व्हर्च्युअली हिरवा झेंडा दाखवला. आपल्या भाषणात राजनाथ सिंह यांनी या यात्रेला ‘नारीशक्तीचे प्रतीक’ असे संबोधले. ही यात्रा तिन्ही सैन्यदलांची सामूहिक शक्ती व एकता, आत्मनिर्भर भारताची भावना आणि त्याचा लष्करी व कूटनीतिक दृष्टिकोन यांचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले. रक्षा मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील नऊ महिन्यांत दहा महिला अधिकारी स्वदेशी नौकायन पोत आयएएसव्ही त्रिवेणीमधून सुमारे २६ हजार नॉटिकल माईल प्रवास करतील. या मोहिमेदरम्यान त्या दोन वेळा भूमध्यरेषा ओलांडतील आणि जगातील तीन प्रमुख केप – लीऊविन, हॉर्न आणि गुड होप – पार करतील.

या प्रवासात त्या जगातील प्रमुख महासागरातून जातील आणि ड्रेक पैसेजसारख्या अतिशय धोकादायक समुद्री प्रदेशातूनही मार्गक्रमण करतील. ही मोहीम अंदाजे नऊ महिन्यांत पूर्ण होण्याची शक्यता आहे. या टीम चार परदेशी बंदरांवर थांबेल आणि पुढील वर्षी मे महिन्यात मुंबईत परत येईल.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219